रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ३४० | पृष्ठे १० | RGD/016/2026-28 www.krushival.in

कृषीवल
रायगड, मंगळवार, दि. १९ मे २०२६
किंमत ४ ₹

## उल्हास नदीत बुडून तरुणाचा मृत्यू

**नेरळ :** उल्हास नदीत पोहण्यासाठी उतरलेल्या १७ वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. प्रचित दत्तात्रय देशमुख असे मृत तरुणाचे नाव आहे. तो नुकताच बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाला असून, सुट्टीच्या निमित्ताने तो नेरळ येथे आपल्या मावशीकडे आला होता. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (दि.१७) दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास नेरळ येथील हेटकर आळी परिसरात राहणाऱ्या आपल्या मावशी व काका रामदास शिंदे यांच्या घरी आला होता. प्रचित मावशी, काका तसेच शेजारील कुटुंबियांसोबत पान २ वर

## जंजिरा किल्ला २६ मेपासून बंद

**मुरुड-जंजिरा :** मुरुड तालुक्यातील राजपुरी येथील सुप्रसिद्ध जंजिरा किल्ला हा मंगळवार, दि.२६ मेपासून बंद करण्यात येणार आहे. नियमानुसार समुद्राला येणारे वादळीवारे व लाटांचा वाढता जोर पाहता पर्यटकांच्या सुरक्षेतला मेरीटाईम बोर्डाने जंजिरा किल्ला बंद करण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे येत्या शनिवार-रविवारी जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटक अलोट गर्दी करण्याची शक्यता वर्तविली जात आहे. जंजिरा किल्ला पहाण्यासाठी राज्यभरातून हजारो पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात. सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी पर्यटकांची पान २ वर

वेधक

## कुंडलिका नदीत सापडला मृतदेह

**धाटाव :** रोहा शहराला लागून वाहणाऱ्या कुंडलिका नदीत सोमवारी (दि.१८) दुपारी १२ ते १ वाजण्याच्या दरम्यान भरतीच्या पाण्यात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह तरंगत असल्याचे पुलावरून जाणाऱ्या नागरिकांच्या नजरेस पडला. या घटनेची माहिती मिळताच रोहा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर पाण्यात तरंगत असलेल्या व्यक्तीचा मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आला. ही व्यक्ती अंदाजे ४५ ते ४६ वर्षांची असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांकडून मिळाली. हा मृतदेह कुंडलिका नदीत कसा आला, याचे कारण अद्याप तरी समलेले नाही. या घटनेमुळे रोहा शहरातील वातावरणात खळबळ निर्माण झाली आहे. दरम्यान, या घटनेचा अधिक तपास रोहा पोलीस करीत आहेत.

# रायगडाचे पावित्र्य धोक्यात!

## गडावर सापडल्या 50 हून अधिक दारूच्या बाटल्या

### पुरातत्त्व विभागाच्या कारभारावर संताप




**| महाड | प्रतिनिधी |**

**हिंदवी स्वराज्याची राजधानी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या ऐतिहासिक रायगड किल्ल्यावर तब्बल ५० हून अधिक दारूच्या रिकाम्या बाटल्या आढळून आल्याने शिवप्रेमी, इतिहास अभ्यासक आणि स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. गडावरील विविध भागांत वाढती अस्वच्छता, प्लास्टिक कचरा आणि मद्यपानाचे प्रकार समोर आल्याने रायगडाचे पावित्र्य नेमके कोण राखणार? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात पायदळ प्रमुख म्हणून कार्य केलेल्या सरनोबत पिलाजीराव गोळे यांचे पंधरावे वंशज लौकिक गोळे यांनी या प्रकाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत राज्य शासन आणि पुरातत्त्व विभागाला थेट जाब विचारला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रायगड किल्ला परिसरातील एमटीडीसीच्या खोल्यांजवळ, राणी वसाच्या मागील भागात तसेच गडावरील इतर काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात दारूच्या बाटल्या, प्लास्टिक कचरा आणि अस्वच्छता आढळून आली. शिवरायांच्या स्मृतींशी जोडलेल्या पवित्र स्थळी असे प्रकार उघड झाल्याने शिवभक्तांमध्ये संताप व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिक आणि इतिहासप्रेमींच्या मते, गडावरील सुरक्षा व्यवस्था अत्यंत अपुरी पडत असून, प्रवेशद्वारांवर काटेकोर तपासणी होत नसल्याने पर्यटकांकडून मद्याच्या बाटल्या सहजपणे गडावर नेल्या जात आहेत. इतिहासाचा अभिमान सांगणाऱ्या गडावरच अशा प्रकारे पावित्र्याची विटंबना होत असेल, तर प्रशासन नेमके काय करत आहे? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. लौकिक गोळे यांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानीचे पावित्र्य जपणे ही शासनाची आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. गडावर सुरू असलेल्या प्रकारांकडे दुर्लक्ष करणे अत्यंत दुर्दैवी आहे.

शिवप्रेमींनी गडावर तातडीने कडक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. त्यामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा वाढवणे, सुरक्षारक्षकांची पान २ वर



> **छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यावर दारूच्या बाटल्या सापडणे ही अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक बाब आहे. गडावर अशा घटना घडत असताना पुरातत्त्व विभाग आणि प्रशासन नेमके काय करत आहे, हा मोठा प्रश्न आहे. रायगडाचे पावित्र्य जपण्यासाठी तातडीने कडक सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही यंत्रणा आणि कठोर कारवाईची गरज आहे. शिवरायांच्या राजधानीची विटंबना कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही.**
> **- लौकिक गोळे**

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**रेवदंडा :** येथील एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची गंभीर घटना उघडकीस आली असून, याप्रकरणी विधीसंघर्षित बालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.१ जानेवारी ते ३१ मार्च या कालावधीत अल्पवयीन व अज्ञान मुलीचा गैरफायदा घेत विधीसंघर्षित बालकाने तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवले. या घटनेत पीडित मुलगी गर्भवती झाल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे रेवदंडा परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

## पनवेलमधील स्मशानभूमीत पाणीच नाही

### विकतच्या पाण्याने विधी करण्याची नामुष्की

**| पनवेल | प्रतिनिधी |**

एकीकडे पनवेल महानगरपालिका स्मार्ट सिटीच्या गप्पा मारत असताना, दुसरीकडे मात्र अत्यंत संतापजनक आणि माणुसकीला काळिमा फासणारा प्रकार समोर आला आहे. पनवेल शहरातील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी पाणीच उपलब्ध नसल्याने, नातेवाईकांना चक्क बिसलेरीच्या (पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर) बाटल्या विकत आणून अंतिम विधी करावा लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या ढिसाळ कारभारामुळे मृतांच्या नातेवाईकांसह स्थानिक नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पनवेलच्या अमरधाम स्मशानभूमीत एकाच वेळी दोन मृतदेह अंत्यसंस्कारासाठी आले होते. मात्र, स्मशानभूमीतील नळांना पाणीच नव्हते. अंत्यविधीच्या वेळी पाण्याचा तुटवडा जाणवल्याने नातेवाईकांनी तात्काळ पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाशी आणि टँकरसाठी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु, प्रशासनाकडून वेळेत टँकरही उपलब्ध करून देण्यात आला नाही. दुःखाच्या डोंगराखाली दबलेल्या नातेवाईकांना प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे नाहक मनस्ताप सहन करावा लागला. अंत्यसंस्काराची वेळ टळत असल्याने आणि पाणी मिळण्याची कोणतीही चिन्हे नसल्याने, अखेर नातेवाईकांनी धावपळ करत बाहेरून पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या विकत आणल्या आणि विधी पूर्ण केला. ''माणूस जिवंत असताना पाण्यासाठी वणवण करावी लागतेच; पण मृत्यूनंतर अंतिम संस्कारासाठीही पालिकेला पाणी देता येत नसेल, तर या प्रशासनाचा काय फायदा?'' असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. स्मशानभूमीसारख्या संवेदनशील ठिकाणी मूलभूत सुविधांची अशी दैना असणे अत्यंत लाजीरवाणे असल्याचे बोलले जात आहे. या गंभीर प्रकरणावर आता पनवेल महानगरपालिका प्रशासन काय कारवाई करणार आणि दोषींवर काय पावले उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## माणगावची कोंडी सुटता सुटेना!

- **अपूर्ण बाह्यवळणाचा प्रवाशांना फटका**
- **महामार्गावर वाहनांच्या रांगाच रांगा**

**सलीम शेख**

**| माणगाव |**

मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव आणि इंदापूर येथील बाह्यवळण रस्त्याचे काम वर्षानुवर्षे रखडले आहे. त्यामुळे ऐन सुट्टीच्या आणि लग्नसराईच्या हंगामात कोकणात जाणारे आणि परत येणाऱ्या पर्यटकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यातच शनिवारी (दि.१६) पुन्हा एकदा हजारो प्रवाशांना भीषण वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. यावेळी महामार्गावर तीन ते चार किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या.

सध्या सुट्टीचा हंगाम असून, सगळीकडे पान २ वर



### सरकार कधी जागे होणार?

इंदापूर आणि माणगाव येथील बाह्यवळणाचे काम जोपर्यंत पूर्ण होत नाही, तोपर्यंत अशी वाहतूक कोंडी वारंवार उद्भवत राहील, हे स्थानिकांचे मत आता केवळ रोष नसून एक कटू वास्तव बनले आहे. सरकारने अनेकदा कामाच्या पूर्ततेच्या घोषणा केल्या; परंतु प्रत्यक्षात परिस्थिती 'जैसे थे'च राहिली आहे. लाखो कोकणवासीय आणि पर्यटकांच्या सोयीसाठी या रखडलेल्या बाह्यवळण रस्त्याकडे सरकार नेमके कधी गांभीर्याने लक्ष देणार? हा प्रश्न आता एक ज्वलंत जनआक्रोश बनला आहे.

## टेम्पो-कारचा भीषण अपघात

**पाली/बेणसे :** पाली-खोपोली महामार्गावर पेडली गावानजिक सोमवारी (दि.१८) पहाटे सहा वाजताच्या सुमारास कार आणि टेम्पो यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला असून, दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, कारमधील प्रवासी खेड येथून मुंबईच्या दिशेने जात होते. कार पेडली परिसरात आली असता चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कारने समोरून येणाऱ्या आयशर टेम्पोला जोरदार धडक दिली. कार चालकाला डुलकी लागल्यामुळे हा अपघात झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. त्यामध्ये रोहन साळुंखे पान २ वर

## राजिपच्या अंतिम आराखड्यास मंजुरी



### स्वच्छता, पाणीपुरवठा कामांवर विशेष भर

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा परिषदेची विशेष सभा सोमवारी (दि.१८) जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे राजिपचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत १५व्या वित्त आयोगांतर्गत २०२५-२६ या वर्षाकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांना वाटप करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या अंतिम पान २ वर

> १५व्या वित्त आयोगाचा ५२ कोटी ७२ लाख ८० हजार निधी आला असून, त्यातून विविध कामे करण्यात येणार आहेत. त्यामध्ये स्वच्छता व पाणीपुरवठा याकडे विशेष लक्ष देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे इतर कामेही वेगाने होतील.
> **- मंगेश वाकडीकर,** अध्यक्ष, राजिप

> १५व्या वित्त आयोगाचा चार वर्षांचा निधी एकत्रितपणे आता देण्यात आला आहे. या निधीअंतर्गत विविध कामे करण्याचा आराखडा आम्ही तयार केला असून, सभागृहाने त्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता विकासकामांना गती येणार असून, सर्वांना समान्य न्यायाने निधीचे वितरण करण्यात येणार आहे.
> - चंद्रकांत कळंबे, अर्थ सभापती, राजिप

## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

**| पनवेल | प्रतिनिधी |**

अल्पवयीन मुलीला लग्न करण्याचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याची धक्कादायक घटन पनवेलमध्ये घडली आहे. याप्रकरणी आरोपीच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पीडित मुलगी ही अल्पवयीन असताना आरोपीने तिच्यासोबत मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर रात्रीच्या वेळी तिच्या घरी गप्पा मारण्याच्या बहाण्याने ''माझे तुझ्यावर प्रेम आहे, तुझे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर मी तुझ्याशी लग्न करणार आहे'', असे बोलून तिला लग्नाचे आमिष दाखवले आणि तिच्यावर अत्याचार केला.




### टाक्या 'फुल्ल' करण्याकडे कल | पेट्रोल पंपांवर वाहनांची गर्दी

## इंधनटंचाईच्या भीतीने 'पॅनिक बायिंग'

**धम्मशील सावंत**

**| पाली/बेणसे |**

इराण आणि इस्त्रायल यांच्यातील युद्धजन्य परिस्थिती व आंतरराष्ट्रीय तणावामुळे खनिज तेलाच्या किमती भडकल्याने देशात पेट्रोल-डिझेलच्या दरात मोठी वाढ झाली आहे. मात्र, दरवाढीनंतरही शहरी व ग्रामीण भागातील पेट्रोल पंपांवर वाहनधारकांची अभूतपूर्व गर्दी पाहायला मिळत आहे. भविष्यात इंधनाचा तुटवडा निर्माण होऊ शकतो, या भीतीने जिल्ह्यातील नागरिकांमध्ये 'पॅनिक बायिंग' म्हणजेच भीतीपोटी खरेदी सुरू झाली असून, बहुतांश वाहनधारक आपल्या वाहनांच्या टाक्या फुल्ल करण्याला प्राधान्य देत आहेत.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचा पुरवठा खंडित होण्याची शक्यता वर्तवली जात असल्याने, आगामी काळात इंधनाचे दर आणखी गगनाला भिडतील किंवा साठा संपेल, अशी अफवा आणि भीती नागरिकांमध्ये पसरली आहे. परिणामी, नेहमी शंभर-दोनशे रुपयांचे पेट्रोल भरणारे दुचाकीस्वार आणि कारचालक थेट टाकी फुल्ल करून घेत आहेत. या अचानक वाढलेल्या मागणीमुळे अनेक पेट्रोल पंपांवरील साठा वेगाने संपत चालला आहे. मर्यादित साठ्यामुळे पंपांवर पेट्रोल संपल्याचे फलक झळकू लागले असून, अनेक वाहनधारकांना इंधनाविनाच माघारी फिरावे लागत आहे. याचा फटका रोजच्या प्रवाशांना आणि नोकरदारांना बसत आहे. आधीच महागाईने पान २ वर






> सध्या पेट्रोल पंपावर येणारे प्रत्येक वाहनधारक टाकी फुल्ल करून देण्याची मागणी करत आहेत. त्यामुळे पंपावरील उपलब्ध साठा अपेक्षेपेक्षा खूप आधीच संपत आहे. अचानक वाढलेल्या या मागणीमुळे साठा नियंत्रित करणे कठीण झाले असून, इतर सर्वसामान्य ग्राहकांना पेट्रोल देणे अशक्य होत आहे. त्यामुळे नागरिकांनी संयम बाळगण्याची गरज आहे.
> **- प्रवीण खाडे,** पेट्रोल पंप मालक, रासळ

# वरसगाव भिरा फाट्यावरील प्रवास जीवघेणा

■ दिशादर्शक फलक नसल्याने वाहनचालकांमध्ये गोंधळ; ठेकेदारांच्या चुकीच्या निर्णयामुळे अपघाताचे प्रमाण वाढले

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वरसगाव-भिरा फाट्यावर दिशादर्शक फलक नसल्यामुळे या महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे कोणाचा नाहक बळी गेला तर याला जबाबदार संबंधित ठेकेदार असेल, अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवासीवर्गातून व्यक्त करण्यात येत आहे.



महामार्गांवरील कोलाड बाजारपेठेत उड्डाण पुलाचे काम सुरु असून, हा मार्ग ५०० मीटर अंतरावर वरसगाव फाट्यावर बंद केला आहे. त्या ठिकाणी मातीचे ढिगारे टाकून ठेवले आहेत; परंतु, येथे कोणतेही दिशादर्शक किंवा सूचना फलक नसल्याने अचानक वाहन चालक हे समोरील मातीच्या ढिगाऱ्यावर जाऊन आदळत आहेत. नुकतेच रात्रीच्या सुमारास एक एर्टिगा गाडी या ढिगाऱ्यावर चढली असून, चालक थोडक्यात बचावला. त्यामुळे अनेक वेळा या ठिकाणी अपघात होताना दिसत आहेत. मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गेल्या १७ वर्षांपासून सुरु असून, ते काही वर्षात पूर्ण ही होईल. त्यामुळे या महामार्गावर वाहनांचा वेग वाढणार आहे. वाहनांचा वेग कमी करण्यासाठी येथे गतिरोधक बसविण्यात आले आहेत. परंतु, ते निष्कृष्ट दर्जाचे असल्यामुळे हे गतिरोधक अपघाताचे कारण ठरत आहेत. या गतिरोधकामुळे या ठिकाणी अनेकवेळा अपघात घडत आहेत.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१९ मे

१) श्री. जगदिशचंद्र विजयसेन ताम्हाणे तळवली, अलिबाग, १९-५-१९४३

२) श्री. भास्कर वासुदेव भातखंडे मु.नागाव, अलिबाग, १९-५-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



**श्रीधर गणपत घोसाळकर स्मरणार्थ. अलिबाग**

**स्व. श्री. भगवानदास शामजी शाह, स्मरणार्थ, बाजार पेठ अलिबाग**

# गोवठणे रंगभूमीत रणांगण नाटकाचा प्रयोग

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील गोवठणे येथील रंगभूमीत जय हनुमान नाट्य मंडळाच्यावतीने शनिवारी (दि.२३) रात्री ९.३० वाजता रणांगण या दोन अंकी नाट्यप्रयोगाचे आयोजन करण्यात आले असून, नाट्यप्रयोगात एकूण ३५ कलाकार आपल्या भूमिका बजावणार आहेत.

नाटकाचे लेखन विश्वास पाटील यांचे आहे. तर, दिग्दर्शन पांडुरंग पाटील यांनी केले आहे. निर्मिती लक्ष्मीकांत म्हात्रे यांची आहे. सहदिग्दर्शन शैलेंद्र म्हात्रे यांचे आहे. पार्श्वगायन जितेंद्र म्हात्रे, संगीत सु.क. म्हात्रे, रंगभूषा

**● नाट्यप्रयोगात ३५ कलाकारांचा सहभाग**

उदय तांगडी, वेशभूषा श्री बापूजी देव फॅन्सी ड्रेस, नेपथ्य राजा जोशी, ध्वनिमुद्रन व्यवस्था मयूर साऊंड, रंगमंच व्यवस्था हर्षद म्हात्रे, तर या नाट्यप्रयोगास बालवीर नाट्य मंडळ गोवठणे, पवनपुत्र कलापथक गोवठणे, संस्थान ग्रुप गोवठणे, जय भवानी मंडळ गोवठणे, श्रीराम नाट्य मंडळ गोवठणे, साईकृपा मित्र मंडळ गोवठणे, नयन स्पोर्ट्स गोवठणे, आई भवानी मित्र मंडळ गोवठणे, मरू आई नाट्य मंडळ विंधणे, विघ्नहर्ता गणेश मित्र मंडळ गोवठणे, जय गणेश मित्र मंडळ गोवठणे, सेव्हन स्टँडर्ड क्रेझीबडी गोवठणे, जय हनुमान प्रसादिक भजन मंडळ गोवठणे या सर्वांचे विशेष सहकार्य लाभले आहे. नाटकात हेमांगी म्हात्रे, नरेंद्र वर्तक, कृष्णकांत म्हात्रे, शैलेंद्र म्हात्रे, निलेश म्हात्रे, अशोक म्हात्रे, प्रेम पाटील, जगन्नाथ वर्तक, रूपम म्हात्रे, आकाश पाटील, रोहन म्हात्रे, विवेक वर्तक, महेश पाटील, अतिश वर्तक, प्रदीप वर्तक, शीतल म्हात्रे, संदेश म्हात्रे, साई म्हात्रे, क्रिश म्हात्रे, सुरेश वर्तक, आर्य म्हात्रे यांच्यासह एकूण ३५ कलाकार भूमिका बजावणार आहेत.

# ‘टोलवसुली तात्काळ बंद करा’

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील टोलवसुली तात्काळ बंद करण्यात यावी, अशी जोरदार मागणी ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे मुंबई प्रदेशाध्यक्ष संतोष पटकारे यांनी महाराष्ट्र शासन तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पत्रकाद्वारे केली आहे.

मुंबई-गोवा महामार्गाचे काम अद्याप अर्धवट असताना १५ मेपासून अचानक खारपाडा टोलनाका सुरू करण्यात आल्याने कोकणवासियांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. स्थानिक नागरिकांना विश्वासात न घेता टोलवसुली सुरू करण्यात आल्याचा आरोपही पटकारे यांनी केला आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या पळस्पे ते इंदापूरदरम्यानच्या ८४ किलोमीटर रस्त्याचे रुंदीकरण आजही पूर्ण झालेले नाही. २००९ मध्ये सुरू झालेला हा प्रकल्प २०१४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. सुरुवातीला ९२२ कोटी रुपयांचा असलेला हा प्रकल्प रखडल्यामुळे त्याची किंमत १२०० कोटी रुपयांवर गेली. दरम्यान, निकृष्ट दर्जाचे काम आणि विलंबामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मुंबई, ठाणे, गुजरात तसेच उत्तर महाराष्ट्रातील हजारो प्रवासी दररोज गोव्याकडे या महामार्गाने प्रवास करत असतात. त्यामुळे महाराष्ट्र शासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष घालून कोकणवासीयांना न्याय द्यावा, अशी मागणी संतोष पटकारे यांनी केली आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● **बोअरवेल/विहिरीसाठी इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे** भूजल संशोधन व केमिकल ट्रीटमेंट द्वारा जुन्या बोअरवेलचे पाणी वाढवणे.

● **नागाव मधील हॉटेलमध्ये काम** करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, हाऊसकीपर, रेस्टॉरंट कॅप्टन, किचन हेल्पर, ब्रेकफास्ट कुक, मेंटेनेंस बॉय इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२

● **फर्निचर शोरूममध्ये सेल्स गर्ल/बॉय पाहिजे.** ठिकाण : झिराड, पात्रता- MBA अनुभव- ३-४ वर्षे सेल्सचा अनुभव, पगार-२५००० महिना + इन्सेटिव्ह. Contact- 9823585321

● **मांडवा जेट्टीजवळ लुमा रिसॉर्टमध्ये अकाऊंटट पाहिजेत.** शिक्षण- ग्रॅज्युएशन, संगणक नॉलेज, टॅली, एक्सेल. मो. ९१४६३८३२५२

● **शुभमुहूर्त प्रथम पुर्नविवाह सर्वजातीय** आंतरजातीय वेबसाईटसह, स्थळांसाठी रोहा पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

● **आवश्यक : सहाय्यक कर्मचारी** खाजगी बंगल्याच्या साफसफाईसाठी आणि देखभालीसाठी जबाबदारी आणि विश्वासू व्यक्तींची आवश्यकता आहे. दैनंदिन घरकाम, सामान्य देखभाल आणि पाहुण्यांच्या व्यवस्थेत मदत करणे या कर्तव्यांमध्ये समाविष्ट आहे. पूर्णवेळ/राहणे पसंत. पूर्वीचा अनुभव इष्ट. स्थान : नागाव, संपर्क : ९८२०४१४८११ बैठकीची तारीख २१ मे २०२६, सकाळी ११ वाजल्यापासून सुरू, किमान वयोमर्यादा १८ ते ३५ वर्षे आहे.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## जेएनपीए चेअरमन दयाळ यांचे अभिनंदन

**। उरण । प्रतिनिधी ।**

आशिया खंडातील सर्वात मोठे बंदर असलेले उरण येथील जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण या बंदराचे (जेएनपीए) चेअरमन म्हणून गौरव दयाळ यांची नियुक्ती झालेली आहे. गौरव दयाळ हे २००४ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांनी गौरव दयाळ यांची भेट घेऊन त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी त्यांनी त्यांच्याशी संवाद साधून जेएनपीएतील कामगारांच्या प्रश्नांसंदर्भात चर्चा केली.

### ग्रामपंचायत देगाव

**ता. माणगाव जिल्हा - रायगड**

**ई-निविदा सन २०२६-२०२७ (1ST CALL)**

**ई-निविदा सुचना**

ग्रामपंचायत देगाव, तालुका माणगाव, जि. रायगड यांचेकडील खालील कामाची निविदा योग्य त्या जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून Percentage Rate Tender दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहे.

सदर निविदा बाबतची माहिती http://mahatenders.gov.in या संकेत स्थलावर ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर उपलब्ध होईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची निविदा रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी | कामाची मुदत | आवश्यक कंत्राटदार | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | CONSTRUCTION OF GRAMPANCHAYAT OFFICE BUILDING AT DEGAON V P DEGAON TALUKA MANGAON DIST RAIGAD | 25,00,000 | 25,000/- | 590/- | 6 महिने | रा.जि.प. कडील नोंदणीकृत कंत्राटदार | ६ व त्या वरील |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे-

१) सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा नोटीस, सूचना, शुद्धीपत्रक इत्यादी माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

२) वरील कामाची निविदेची http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून खाली दिलेल्या कालावधीत असेल.

३)

| तपशिल | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| संकेत स्थळावरून ई-निविदा प्रसिद्धी कालावधी | १८/०५/२०२६ | १६.०० | २८/०५/२०२६ | १६.०० |
| निविदा फॉर्म व परिशिष्ट डाऊनलोड करण्याचा कालावधी | १८/०५/२०२६ | १६.०० | २८/०५/२०२६ | १६.०० |
| ई-निविदा सादर करणेचा कालावधी | १८/०५/२०२६ | १६.०० | २८/०५/२०२६ | १६.०० |
| ई-निविदा उघडणेचा तारीख व वेळ | दिनांक २९/०५/२०२६ वेळ १६.०० वाजता | | | |

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत देगाव**
**ता. माणगाव, जि. रायगड**

सरपंच
**ग्रुप ग्रामपंचायत देगाव**
**ता. माणगाव, जि. रायगड**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे निकोप ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्या कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हि. नं. | क्षेत्र : हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| अशोक सदानंद फराट | १ | ९ | ०-५२-२० | ५=३३ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

हे सर्वास कळावे.

ठिकाण :- नेरळ
दिनांक :- १९/५/२०२६

**डॉ. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभात दर्शन अपार्टमेंट ब्लॉक नं.१०१
नेरळ ता.कर्जत जि.रायगड
मो.९८८१२७९८१७

### - जाहीर नोटिस-

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिलांनी मौजे शहाबाज, ता.अलिबाग, येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत, मिळकतीचे सामाईक विद्यमान मालक आशालता भगवान पाटील वगैरे ८ यांचेकडून विकत घेण्याचे ठरवून तसा विक्रीचा व्यवहार आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये ठरलेला आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे शहाबाज, ता.अलिबाग, भूमापन क्रमांक व उपविभाग ५१०, जिरायत क्षेत्र ०-७७-००, पो.ख.०-०३-९०, एकूण क्षेत्र ०-८०-९०, आकार रु.९.०४/- जमीन मिळकत हा या नोटिसचा विषय आहे.**

तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकत विद्यमान मालकांच्या सामाईक ताबे कब्जाची, वहिवाटीची, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिली आहे. तरी वरील जमीन मिळकत संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १९.०५.२०२६

**अॅड. मिलिंद चव्हाण**
८. आनंद अपार्टमेंट, श्रीबाग-३, अलिबाग

### जाहीर आवाहन

मुरुड जंजिरा नगरपरिषदेमार्फत आर्थिक वर्ष २०२६-२०२७ करीता मालमत्ता कर व पाणीपट्टी कराच्या देयकांचे वाटप करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. सर्व नागरीकांनी आपली देयके प्राप्त होताच दंड व अतिरिक्त आकारणी टाळण्यासाठी मालमत्ता कर व पाणीपट्टी कराचा भरणा लवकरात लवकर करावा, तसेच कोणत्याही नागरीकास देयके प्राप्त झाली नसल्यास त्यांनी नगर परिषद कार्यालयाशी संपर्क साधून देयके प्राप्त करुन घ्यावीत व नियमानुसार कर भरणा करावा.

सर्व नागरीकांनी नगरपरिषदेस सहकार्य करावे.

सही/-
मुख्याधिकारी
मुरुड जंजिरा नगरपरिषद

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) अभिजित शशिकांत मोहिते एच यु एफ २) रणजित हिम्मतमल जैन ३) रमणिकलाल करमसी पटेल ४) श्रीकांत जुगराज ओसवाल ५) मोहनलाल भैरूमलजी लुणीया ६) ज्योती प्रविण घरत यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव ता. अलिबाग | २१८७/१/६ | ३-२५-०० | ३२.५० |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १८/०५/२०२६

**अॅड. विराज शरद अंबुकर**
मु. हनुमान वाडी, थेरोंडा, पो. चौल
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा क्र. ९०२८८५१२८०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे गौरकामत आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक कांताबाई बळवंत झुंझारराव यांचेकडून सदर मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३ | १/ब | ०-१०-०० | १-०८ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १९/०५/२०२६

**अॅड. संदीप हरिश्चंद्र मसणे**
बी. ए. एल. एल. बी.
पत्ता - ब्लॉक नं.१०१, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, पहिला मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९६०४५४५७७७

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक १. श्री. शिरीष गोपाळ सालियन, २. सौ. सुप्रिया शिरीष सालियन, दोघे रा. १/२२, टेक्नोक्रॅट सोसायटी, व्ही. एस. मार्ग, ट्विन टॉवर लेन, सिद्धीविनायक मंदिराजवळ, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५ त्यांच्या नांवे असलेली बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग | १२१४/२ | - | ०-१९-०० | ९.५० |

वर नमूद बागायत मिळकत व या बागायत मिळकतीत असणारे ग्रुप ग्राम पंचायत घर क्र. ३४२ यासह

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठे करार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १४/०५/२०२६

सही / -
**अॅड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## पान १ वरून

## उल्हास नदीत बुडून तरुणाचा मृत्यू

नेरळ-कळंब राज्य मार्गावरील दहिवली तर्फे वरेडी येथील बिरदोले परिसरातील उल्हास नदीवर कपडे धुण्यासाठी गेला होता. दरम्यान, काहीजण नदीकाठी कपडे धूत असताना प्रचित हा पोहण्यासाठी नदीत उतरला. मात्र, नदीतील खोल पाण्याचा अंदाज न आल्याने तो पाण्यात बुडाला. त्याने आपल्याला वाचवण्यासाठी हाकदेखील दिली. त्यावेळी मावशीने व शेजारील अरुण गावंडा यांनी त्याला वाचवण्यासाठी नदीत उडी घेतली होती. मात्र, काही सेकंदांतच प्रचित पाण्यात दिसेनासा झाला. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. स्थानिक नागरिक आणि नातेवाईकांनी तात्काळ शोधमोहीम सुरू केली. सुमारे दीड तासाच्या प्रयत्नानंतर प्रचितला नदीबाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्याला तातडीने नेरळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी आणण्यात आले. परंतु, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले. या घटनेची नोंद नेरळ पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, देशमुख कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## जंजिरा किल्ला २६ मेपासून बंद

किल्ल्याच्या प्रवेशद्वारजवळ मोठी गर्दी होते. त्यातच पावसाळा जवळ आल्याने लाटांचा प्रवाह वाढल्याने शिडाच्या बोटी हेलकावे घेत असल्याने किल्ल्यावर उतरणेदेखील जिकरीचे झाले होते. सध्या किल्ल्यावर तिकीट घेण्यासाठीसुद्धा मोठी गर्दी पाहावयास मिळत आहे. त्यातच आता मंगळवार, दि.२६ मेपासून जंजिरा किल्ला पुढील तीन महिने बंद राहणार असून, सप्टेंबर महिन्यात पुन्हा या किल्ल्याची दालने उघडणार आहेत. त्यामुळे येत्या शनिवार-रविवारी किल्ल्यावर पर्यटकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. शिडाच्या बोटीवर काम करणाऱ्यांना हा शेवटचा रोजगार असून, तद्नंतर त्यांना तीन महिने घरीच बसावे लागणार आहे. म्हणून जास्ती जास्त पर्यटकांना किल्ल्यात नेण्याचा प्रयत्न शिडाच्या बोटीधारकांकडून केला जात आहे.

## रायगडाचे पावित्र्य धोक्यात!

संख्या वाढवणे, प्रवेशद्वारांवर कडक तपासणी करणे, दारूबंदीचे स्पष्ट फलक लावणे आणि नियम तोडणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे यांचा समावेश आहे. इतिहास, संस्कृती आणि स्वराज्याच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या रायगड किल्ला वर घडलेल्या या प्रकारामुळे आता पुरातत्त्व विभाग आणि प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शिवरायांच्या राजधानीचे पावित्र्य वाचवण्यासाठी प्रशासन तातडीने कठोर पावले उचलणार का, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## माणगावची कोंडी सुटता सुटेना!

लग्नसराईचीदेखील धावपळ सुरू आहे. त्यामुळे अनेकजण आपली खासगी वाहने घेऊन कोकणाच्या दिशेने निघाले. तर, काही जण कोकणातून परतिच्या मार्गाला लागले आहेत. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडीची समस्या उद्भवत आहे. माणगाव-इंदापूरदरम्यान मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या उद्भवत आहे. त्यावर तोडगा म्हणून माणगाव-इंदापूर बाह्यवळण रस्त्याचे काम सुरू करण्यात आले होते. परंतु, हा रस्ता वर्षानुवर्षे रखडला आहे. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव-इंदापूरदरम्यान प्रवासीवर्गाला वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. शनिवारी कोकणाच्या दिशेने निघालेल्या तसेच कोकणातून परतणाऱ्या वाहनांनी अक्षरशः ठप्प करून टाकला होता. माणगावपासून दोन्ही बाजूंना वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. अनेक वाहने तब्बल तीन ते चार तास जागच्या जागी खोळंबून राहिली होती. कडक उन्हात गाड्यांमधील प्रवाशांना पाणी, अन्न, इंधन आणि प्रसाधनगृहांचीही वानवा भासू लागली होती. ही वाहतूक कोंडी नियंत्रणात आणण्यासाठी माणगाव पोलीस आणि वाहतूक शाखा आणि होमगार्ड यांनी प्रयत्न केले. परंतु, वाहनांचा इतका प्रचंड ओघ होता की त्यांच्या प्रयत्नांना मर्यादित यश मिळाले. त्यामुळे कोंडी पूर्णपणे सुटायला बराच वेळ लागला.

माणगाव आणि इंदापूर येथील बाह्यवळण मार्गाचे काम पूर्ण झाले असते, तर शहराच्या अंतर्गत बाजारपेठेतून जाणारी वाहतूक टळली असती आणि वाहतूक कोंडी निर्माणच झाली नसती. मात्र, गेल्या काही वर्षांत या बाह्यवळण रस्त्याचे अनेक ठेकेदार बदलले, लोकप्रतिनिधींकडून अनेक घोषणा झाल्या; परंतु, प्रत्यक्षात मात्र कामाची गती कायम संथच राहिली. परिणामी प्रत्येक सण, उत्सव आणि सुट्टीच्या काळात प्रवाशांना हीच यातना भोगावी लागत आहे. मुंबई-गोवा महामार्ग हा कोकणच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाचा कणा मानला जातो. परंतु, त्याच महामार्गावरील अपूर्ण कामांमुळे दरवेळी सामान्य प्रवाशांनाच मोठी किंमत मोजावी लागत आहे.

## टेम्पो-कारचा भीषण अपघात

यांचा मृत्यू झाला. तर, प्रकाश हजारे आणि अविनाश पडवळ हे गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि स्थानिक मदत यंत्रणांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. हा अपघात इतका भीषण होती की, जखमी कारमध्येच अडकले होते. त्यांना कटरच्या सहाय्याने कारचे दरवाजे तोडून बाहेर काढण्यात आले. जखमींवर सध्या कामोठ्यातील एमजीएम हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. या अपघाताचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## राजिपच्या अंतिम आराखड्यास मंजुरी

आराखड्यास उपस्थित सर्व जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समितीच्या सभापतींच्या अनुमोदनानंतर मंजुरी देण्यात आली.

ग्रामविकास विभागाकडून २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षातील १५व्या वित्त आयोगाचा एकूण ५२ कोटी ७२ लाख ८० हजार ९९० रुपये निधी रायगड जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आला आहे. राजिपचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, अर्थ सभापती चंद्रकांत कळंबे यांच्या मार्गदर्शनाखाली वित्त विभागाने प्राप्त बंधित व अबंधित अनुदानातून करावयाच्या कामांचा आराखडा तयार करण्यात आला होता. १५व्या वित्त आयोगांतर्गत मिळालेल्या निधीपैकी ३० टक्के निधी हा स्वच्छता, ३० टक्के निधी हा पाणीपुरवठा व उर्वरित ४० टक्के निधी हा इतर मूलभूत कामांसाठी वापरण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. या आराखड्याला उपस्थित सर्व जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापतींनी अनुमोदन दिल्यानंतर अंतिम मंजुरी देण्यात आली.

## इंधनटंचाईच्या भीतीने ‘पॅनिक बायिंग’

होरपळणाऱ्या सर्वसामान्यांना या नव्या दरवाढीमुळे आणि इंधन टंचाईच्या भीतीमुळे मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. वाहतूक व्यवस्थेवरही याचा अंशतः परिणाम दिसून येत आहे.

युद्धाच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल व डिझेल संपेल, तसेच आणखी किमती वाढतील, अशी भीती नागरिकांना वाटत आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून लोक इंधन भरण्यासाठी गर्दी करत आहेत. बरेचजण थेट टाकी फुल्ल करत आहेत. त्यामुळे सर्वांना इंधन पुरवठा करताना खूप ताण येत आहे. लोकांनी गरजेपुरतेच इंधन भरावे जेणेकरून इतरांनादेखील इंधन मिळू शकेल.

- संदीप जाधव, पेट्रोल पंप व्यवस्थापक, सुधागड

# जेएनपीएच्या 'सीबीएसई प्रोजेक्ट' कोलमडला

- साडेचाळीस कोटींच्या शाळा प्रकल्पाला अखेर ब्रेक
- केंद्रीय मंत्र्यांचा निकटवर्तीय ठेकेदार काम सोडून पळाला
- उरणकरांच्या शैक्षणिक स्वप्नांवर पाणी

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण परिसरातील हजारो विद्यार्थ्यांसाठी साकार होणारे सीबीएसई शाळेचे स्वप्न अखेर धुळीस मिळाले आहे. जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी अर्थात जेएनपीएकडून सुमारे साडेचाळीस कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या भव्य सीबीएसई




शाळा प्रकल्पाला अखेर रद्द करण्याची वेळ आली आहे. केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या निकटवर्तीय मानल्या जाणाऱ्या आसाममधील ठेकेदाराने काम अर्धवट सोडून पलायन केल्याने जेएनपीए प्रशासनावर तीव्र टीका होत आहे.

उरण परिसरातील प्रकल्पग्रस्त व सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना दर्जेदार सीबीएसई शिक्षण स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हावे, यासाठी तत्कालीन जेएनपीए अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला होता. जेएनपीएच्या कामगार वसाहतीतील जागेवर सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक शाळा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या प्रकल्पासाठी तब्बल ४० कोटी ५० लाख रुपयांचे टेंडर काढण्यात आले होते. आसाममधील मेसर्स दिपक शर्मा कंपनीला काम देण्यात आले होते. जानेवारी २०२५ मध्ये कार्यादेश देत जानेवारी २०२७ पर्यंत काम पूर्ण करण्याची मुदत देण्यात आली होती. प्रारंभी पायलिंगचे काम सुरू झाले; मात्र त्यानंतर ठेकेदाराने अचानक काम बंद केले. ११ जून २०२६ रोजी पाठवलेल्या पत्रात आसाममधील पूरस्थिती, अतिवृष्टी आणि यंत्रसामग्रीचे नुकसान झाल्याचे कारण देत कंपनीने काम पूर्ण करण्यात असमर्थता दर्शवली. या कारणांवर विश्वास ठेवत प्रशासनाने बोर्ड ऑफ ट्रस्टीच्या बैठकीत प्रकल्पच रद्द करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, काम अपूर्ण ठेवणाऱ्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याऐवजी केलेल्या कामाची बिले, अनामत रक्कम आणि बँक गॅरंटीची कोट्यवधींची रक्कमही अदा केल्याचा आरोप होत आहे.

> "जेएनपीएकडे आधीपासून दोन शाळांचा भार आहे. सध्या संबंधित ठेकेदाराने सीबीएसई शाळेच्या इमारतीचे काम करण्यास असमर्थता दर्शवली आहे. त्यामुळे सदर प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे."
> – रवीश कुमार सिंह

## खोपोली पालिकेत 'नगरसेवक पती'राज ?



- सर्वसाधारण सभेतच वाद उफाळला
- नगराध्यक्षांकडूनच संबंधितांना दिला घरचा आहेर

| खोपोली | प्रतिनिधी |

खोपोली नगरपालिकेच्या कामकाजात काही नगरसेविकांच्या पतींचा वाढता हस्तक्षेप आणि विकासकामांवरील श्रेयवाद अखेर सर्वसाधारण सभेतच उफाळून आला. प्रशासनाने नेमके निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचे ऐकायचे की सोशल मीडियावर सक्रिय असलेल्या तथाकथित 'नगरसेवक पतीं'चे, असा थेट सवाल उपस्थित करत नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरले. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनीही ''पालिका प्रशासनाने फक्त नगराध्यक्ष आणि अधिकृत नगरसेवकांचेच ऐकावे,'' अशी स्पष्ट सूचना देत अप्रत्यक्षपणे संबंधितांना घरचा आहेर दिल्याची चर्चा रंगली आहे.

खोपोली शहरात विविध विकासकामे सुरू असताना काही प्रभागांमध्ये नगरसेविकांचे पतीच प्रत्यक्ष नगरसेवक असल्याप्रमाणे वावरत असल्याचे आरोप वाढू लागले आहेत. सोशल मीडियावरील प्रसिद्धी, उद्घाटने आणि प्रभागातील हस्तक्षेप यामुळे निवडून आलेल्या नगरसेवकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

नुकत्याच पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत नगरसेवक राहुल गायकवाड यांनी हा मुद्दा आक्रमकपणे उपस्थित केला. ''कधी नगरसेविकांचे पती, तर कधी काही कार्यकर्ते स्वतःलाच नगरसेवक समजून वावरताना दिसत आहेत. प्रशासनाने जनतेतून निवडून आलेल्या प्रतिनिधींचे ऐकायचे की सोशल मीडियावर सक्रिय असणाऱ्यांचे?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

यावर नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी पालिका अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सूचना देत, ''नगराध्यक्ष आणि प्रभागातून अधिकृतपणे निवडून आलेल्या नगरसेवकांच्याच सूचनांना प्राधान्य द्यावे,'' असे सांगितले.

दरम्यान, शहरातील घंटागाडी सेवा वेळेवर पोहोचत नसल्याबद्दल नगरसेवक सुनील पाटील यांच्यासह अन्य सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. शहरातील स्वच्छता व्यवस्थेबाबत प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणीही करण्यात आली.

खोपोली पालिकेतील वाढता श्रेयवाद, नगरसेविकांच्या पतींचा कथित हस्तक्षेप आणि प्रशासनावरील दबाव यामुळे शहरातील राजकारण तापू लागल्याचे चित्र असून, पुढील काळात हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## तलाठी कार्यालय उरणमध्ये स्थलांतरित करा

### ग्रामस्थांचे तहसीलदारांना निवेदन

| उरण | प्रतिनिधी |

उरण येथील तलाठी कार्यालय सन २०२३ पासून जेएनपीटी वसाहतीमध्ये हलविण्यात आल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार करत हे कार्यालय पुन्हा उरण शहरात किंवा लगतच्या परिसरात स्थलांतरित करावे, अशी मागणी माजी सरपंच आणि ग्रामस्थांनी केली आहे.

उरणमधील तलाठी कार्यालयाची इमारत नादुरुस्त झाल्यानंतर कार्यालय जेएनपीटी वसाहतीत हलविण्यात आले. मात्र, उरण शहर, केगाव, नागाव, रानवड, बोरीपाखाडी, म्हातावली आणि चाणजे परिसरातील नागरिकांना कार्यालयीन कामासाठी जेएनपीटी वसाहतीपर्यंत जाणे खर्चिक आणि त्रासदायक ठरत आहे. टाऊनशिप गेटपासून सुमारे एक किलोमीटर पायी जावे लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

यासंदर्भात समाजसेवक तथा माजी सरपंच काशिनाथ गायकवाड, नयन म्हात्रे, किसन कोळी आणि राकेश म्हात्रे यांनी उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांना निवेदन देत कार्यालय तातडीने उरणमध्ये हलविण्याची मागणी केली आहे.

माजी सरपंच काशिनाथ गायकवाड आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून २०२३ पासून या मागणीचा सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे सांगण्यात आले. अनेक वेळा कार्यालयात फेऱ्या मारूनही अधिकारी भेटत नसल्याने नागरिकांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

याचबरोबर कृषी कार्यालयही उरणमध्ये स्थलांतरित करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, जून महिन्यापर्यंत तलाठी आणि कृषी कार्यालय स्थलांतरित न केल्यास तहसील कार्यालयासमोर उपोषण आंदोलन करण्याचा इशारा माजी सरपंचांच्यावतीने देण्यात आला आहे.


## दोन वाहनांचा अपघात; वाहनांचे नुकसान

| पनवेल | प्रतिनिधी |

थार गाडीने एर्टिगा कारला दिलेल्या धडकेत दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. या अपघाताप्रकरणी थार गाडीवरील वाहन चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. थार वाहन क्रमांक २६ बीएच ३१२४ ए वरील चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवले आणि मंजीत लालजी कुरमे (रा. सेक्टर आर दोन, करंजाडे) यांच्या एरर्टिगा कार क्रमांक एमएच ४६ बीके ८१५३ या गाडीला पाठीमागून धडक दिली. या अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे.

## गोविंद पुनकर यांना देवाज्ञा

| अलिबाग | प्रतिनिधी |



अलिबाग तालुक्यातील भिलजी गावचे रहिवासी गोविंद जगन्नाथ पुनकर यांचे शुक्रवारी (दि. १५) रोजी पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७२ वर्षे होते. भिलजी येथील वैकुंठधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्यविधीसाठी जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावली होती.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, मुली, जावई, भाऊ, पुतणे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभण्यासाठी शनिवार (दि. २३) पर्यंत स्वर्गरोहन ग्रंथ वाचन करण्यात येत आहे. त्यांचे दशक्रिया विधी रविवारी (दि.२४) श्रीक्षेत्र उध्दर रामेश्वर पाली येथे होणार आहेत, त्यांचे उत्तरकार्य विधी त्यांच्या राहत्या घरी भिलजी येथे होणार आहेत. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी समस्त पुनकर परिवार आणि ग्रामस्थ मंडळ भिलजी यांच्यावतीने रविवार (दि. २४) ते गुरुवार (दि. २८) पर्यंत भजन आणि सामुदायिक हरिपाठ आयोजित करण्यात आला आहे.

## रेल्वे कारशेडच्या भरावाविरोधात ग्रामस्थ आक्रमक

### कर्जत तहसील कार्यालयावर मोर्चा

| नेरळ | प्रतिनिधी |



कर्जत तालुक्यातील भिवपुरी रोड परिसरात सुरू असलेल्या एमआरव्हीसीच्या रेल्वे कारशेड प्रकल्पासाठी टाकण्यात आलेल्या मातीच्या भरावामुळे संभाव्य पूरस्थितीचा धोका निर्माण झाल्याचा आरोप करत ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांनी कर्जत तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. ''कारशेडचा भराव, पुराचा कहर'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

भिवपुरी रोड स्थानकाजवळ सुमारे सहा फूट उंचीचा भराव टाकण्यात आल्याने बेंडसे, वावे, भातगाव, बार्डी आणि कोषाणेवाडी या गावांमध्ये यंदाच्या पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. भरावामुळे उल्हास नदीच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बदलून पाणी गावांमध्ये शिरू शकते, असा दावा आंदोलकांनी केला.

या पार्श्वभूमीवर ग्रामस्थ, शेतकरी आणि महिलांनी मोठ्या संख्येने तहसील कार्यालयावर धडक देत प्रशासनाकडे तातडीने कारवाईची मागणी केली. यावेळी तहसीलदार धनंजय जाधव, पाटबंधारे विभागाचे संदेश मेंगाळ, रेल्वे अधिकारी गणेश दांडे तसेच उपसभापती चित्रा ठाकरे उपस्थित होते.

बैठकीदरम्यान रेल्वे प्रशासनाने तज्ज्ञांच्या अहवालानुसार आवश्यक उपाययोजना करण्यात येतील तसेच परिस्थितीचे संपूर्ण मूल्यमापन होईपर्यंत कारशेडचे काम तात्पुरते स्थगित ठेवण्याचे आश्वासन दिले. दरम्यान, या भरावासाठी मोठ्या प्रमाणात बेकायदा उत्खनन सुरू असल्याचाही आरोप ग्रामस्थांनी केला. पर्यावरण, शेती आणि मानवी सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याने प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.

## डीबीएटीयूचा सहा वर्षांचा बृहत् आराखडा मंजूर

| माणगाव | प्रतिनिधी |


फार्मसी क्षेत्रातील नवीन संस्थांवर निर्बंध

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (डीबीएटीयू) चा सन २०२५ ते २०३१ या कालावधीसाठीचा सर्वसमावेशक बृहत् आराखडा महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीत विद्यापीठाचे कार्यकारी कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी हा आराखडा सादर केला. तांत्रिक शिक्षण अधिक रोजगाराभिमुख, संशोधनाधारित आणि उद्योगपूरक करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेला हा आराखडा राज्याच्या उच्च शिक्षण क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

बैठकीत फार्मसी शिक्षणासंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०२७-२८ ते २०३०-३१ या कालावधीत राज्यात नवीन बी.फार्मसी आणि डी.फार्मसी संस्था सुरू न करण्याची तसेच विद्यमान संस्थांची प्रवेशक्षमता न वाढवण्याची शिफारस केंद्र सरकार आणि फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाकडे करण्यात येणार आहे. उपलब्ध संस्थांचा दर्जा उंचावण्यावर भर देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

आराखड्यात शैक्षणिकदृष्ट्या मागास जिल्ह्यांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. गडचिरोली, नंदुरबार, हिंगोली, वाशिम, धाराशिव, सिंधुदुर्ग आणि परभणी जिल्ह्यांमध्ये अभियांत्रिकी महाविद्यालये तसेच बी.व्होक अभ्यासक्रम सुरू करण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. याशिवाय धाराशिव आणि परभणी येथे वास्तुशास्त्र अभ्यासक्रम, तर नंदुरबार आणि सिंधुदुर्ग येथे हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी महाविद्यालयांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे.उद्योग आणि शिक्षण यांच्यातील समन्वय वाढवण्यासाठी अभ्यासक्रम अद्ययावत करणे, संशोधनासाठी उद्योगांशी भागीदारी वाढवणे तसेच विद्यार्थ्यांना इंटर्नशिप व प्रात्यक्षिकांच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंगलप्रभात लोढा, उदय सामंत यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## गुरांसाठी मोफत आरोग्य तपासणी



| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने पांजरपोळ येथे गुरांसाठी मोफत आरोग्य तपासणी व लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला पशुपालक व शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

शिबिरामध्ये सुमारे २०० गुरांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून, त्यामध्ये लहान वासरांचाही समावेश होता. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी गुरांची तपासणी करून आवश्यक लसीकरण तसेच औषधोपचार केले. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जनावरांमध्ये रोगराई पसरू नये यासाठी विशेष प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. जनावरांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे शेतकरी व पशुपालकांनी स्वागत केले.

### पर्यावरणाच्या रक्षणासाठी कर्जतकरांचे धरणे आंदोलन | विनाशकारी प्रकल्पांना तीव्र विरोध

## 'कर्जत वाचवा, निसर्ग वाचवा'च्या घोषणांनी टिळक चौक दणाणला

| कर्जत | प्रतिनिधी |



कर्जत तालुक्यात प्रस्तावित आणि सुरू असलेल्या विविध धरण, वीज व औद्योगिक प्रकल्पांविरोधात सोमवारी कर्जतमध्ये नागरिकांनी एकदिवसीय धरणे आंदोलन करत तीव्र संताप व्यक्त केला. 'विकास हवा पण विनाश नको', 'कर्जत वाचवा, निसर्ग वाचवा' अशा घोषणांनी टिळक चौक परिसर दणाणून गेला.

कर्जत तालुका पर्यावरण बचाव संघर्ष समिती यांच्या वतीने आयोजित आंदोलनात तालुक्यातील विविध गावांतील नागरिक, शेतकरी, पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक व्यावसायिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनकर्त्यांनी कोंढाणा, पोशिर, शिलार, टाटा, टोरेंट, पाली-भूतिवली तसेच रेल्वे कारशेड प्रकल्पांमुळे हजारो एकर जंगल, शेती आणि नैसर्गिक साधनसंपत्ती धोक्यात आल्याचा आरोप केला. विशेषतः टोरेंटच्या प्रस्तावित पंप स्टोरेज प्रकल्पासाठी सुमारे ६०० एकर जंगल आणि अडीच लाखांहून अधिक झाडांची कत्तल होणार असल्याने संताप व्यक्त करण्यात आला.

कर्जतची ओळख ही हिरवेगार डोंगर, नद्या, जंगल आणि पर्यटनावर आधारित आहे. पर्यटन व्यवसायावर हजारो स्थानिक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून असून, मोठ्या प्रकल्पांमुळे हा संपूर्ण पर्यावरणीय आणि आर्थिक समतोल बिघडण्याची भीती व्यक्त होत आहे.

### कर्जतसमोरील प्रमुख प्रकल्प आणि प्रश्न

**टोरेंट प्रकल्प** : पाली-साई डोंगर आणि ढाक परिसरात प्रस्तावित ३००० मेगावॅट क्षमतेच्या पंप स्टोरेज प्रकल्पासाठी सुमारे ९३२ एकर जमीन लागणार असून, त्यातील ६०० एकर वनक्षेत्र आहे. लाखो झाडांची तोड, वन्यजीवांवर परिणाम आणि पर्यावरणीय हानीची भीती व्यक्त केली जात आहे.

**पोशिर धरण**' सुमारे ५४०० एकर क्षेत्र बाधित होणाऱ्या या प्रकल्पामुळे अनेक गावे आणि हजारो कुटुंबांवर विस्थापनाचे संकट आहे. प्रकल्पातील पाणी मुंबई महानगर क्षेत्रासाठी वापरले जाणार असल्याने स्थानिकांना फायदा काय, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**शिलार धरण** : पनवेल आणि नवी मुंबईसाठी प्रस्तावित या धरणामुळे मोठ्या प्रमाणावर वनजमीन आणि शेती बाधित होणार आहे. स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात न घेतल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

## निवडक



### वाघ्रण आरोग्य उपकेंद्राच्या नवीन इमारतीचे भूमीपूजन

**वाघ्रण** : तालुक्यातील वाघ्रण येथील आरोग्य उपकेंद्राच्या नवीन इमारत बांधकामाचे भूमीपूजन शनिवारी उत्साहात पार पडले. राष्ट्रीय आरोग्य सुरक्षा योजनेंतर्गत मंजूर झालेल्या या इमारतीच्या कामाचा शुभारंभ शेकाप कार्यकर्ते राजेंद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. सायंकाळी पाच वाजता झालेल्या या कार्यक्रमात उपकेंद्राच्या 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' समितीचे सदस्य तथा पत्रकार दिपक यशवंत पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या कार्यक्रमाला वाघ्रण आणि खारपेढांबे गावांतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. यामध्ये आर. बी. पाटील, अविनाश म्हात्रे, नामदेव पाटील, तुकाराम पाटील, प्रमोद पाटील, गौतम पाटील, उदय पाटील, विद्याधर पाटील, गिरीश पाटील, दीपक पाटील, रविकिरण पाटील, एच. एन. पाटील, तनवेश पाटील, आत्माराम पाटील, माधव पाटील, असिता म्हात्रे, ललिता पाटील, अंजली म्हात्रे, बंदिनी पाटील, विवेक पाटील, संजय पाटील तसेच ठेकेदार प्रतिनिधी चिंतामण पाटील आदींचा समावेश होता. कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने करण्यात आली.




### शालेय साहित्याच्या वाढत्या दरांनी हैराण

**पनवेल** : मे महिन्याच्या अखेरीस नव्या शैक्षणिक वर्षाची चाहूल लागताच पनवेल शहरातील पुस्तक दुकाने, गणवेश विक्री केंद्रे आणि शालेय साहित्याच्या दुकानांमध्ये पालक व विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होत आहे. जूनपासून शाळा सुरू होणार असल्याने विद्यार्थ्यांची नव्या वर्गासाठी तयारी सुरू झाली आहे.नवीन पुस्तके, वह्या, दप्तर, बूट, गणवेश तसेच अन्य शालेय साहित्य खरेदीसाठी पालकांची धावपळ सुरू असली, तरी यंदा वाढलेल्या किमतींमुळे सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. पुस्तकांचे वाढलेले दर, खासगी प्रकाशनांचे अतिरिक्त साहित्य आणि गणवेशांच्या वाढत्या किमतींमुळे शिक्षणाचा खर्च दिवसेंदिवस वाढत असल्याची चर्चा पालकांमध्ये सुरू आहे.काही शाळांकडून विशिष्ट दुकानांतूनच साहित्य खरेदी करण्याचा आग्रह धरला जात असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. त्यामुळे अनेक पालक आपल्या परवडीनुसार वेगवेगळ्या दुकानांतून साहित्य खरेदी करण्याला प्राधान्य देत आहेत. शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत हक्क असून शिक्षणासाठी लागणाऱ्या साहित्याच्या वाढत्या दरांमुळे सर्वसामान्य पालकांवर आर्थिक ताण पडत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

### हार्बर प्लॅटफॉर्म ९० मीटरनेच पुढे सरकला

**पनवेल** : पनवेल रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म खूप लांब गेल्याच्या आणि प्रवाशांना प्रचंड पायपीट करावी लागत असल्याच्या सोशल मीडियावरील दाव्यांचे मध्य रेल्वेने स्पष्टपणे खंडन केले आहे. मध्य रेल्वेने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, पनवेल उपनगरीय टर्मिनस येथील विद्यमान हार्बर लाईन प्लॅटफॉर्मचा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या दिशेकडील भाग केवळ ९० मीटरने, म्हणजेच सुमारे ३ डबे मावतील एवढ्याच अंतराने पुढे सरकवण्यात आला आहे. हा बदल सोमवार, ११ मे २०२६ पासून लागू करण्यात आला आहे. सध्या सोशल मीडियावर हा प्लॅटफॉर्म तब्बल १ किलोमीटरने वाढवण्यात आल्याच्या चुकीच्या अफवा पसरत आहेत. या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेचे वरिष्ठ विभाग अभियंता श्रीकुमार यांनी स्पष्ट केले की, प्लॅटफॉर्मचा विस्तार केवळ ९० मीटरचाच असून, यामुळे प्रवाशांना फक्त २ ते ३ मिनिटे अतिरिक्त चालावे लागत आहे. त्यामुळे प्रवाशांनी सोशल मीडियावरील कोणत्याही अतिशयोक्तीपूर्ण दाव्यांवर किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये. हा प्रकल्प प्रवाशांच्याच हिताचा असल्याने, पुढील ६ महिने बांधकाम पूर्ण होईपर्यंत प्रवाशांनी रेल्वे प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.





### वारकरी बालसंस्कार शिबिराला प्रतिसाद

**खरोशी** : दरवर्षी श्री विठू माऊली चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने मोफत अध्यात्मिक वारकरी संप्रदायिक बालसंस्कार शिबिराचे आयोजन श्रीक्षेत्र बोपोली शिवचंद्र मौलेश्वर या ठिकाणी ५ मे ते १६ मेदरम्यान करण्यात आले होते. यामध्ये ५० पेक्षा जास्त मुलं शिक्षण घेत होती. शेवटच्या दिवशी काल्याचे कीर्तन संपन्न झाले. यावेळी भाकरवड, देहेन, चरी, शहाबाज, पोयनाड, तळाशेत, नवेनगर, कोलघर श्रीगाव आदी परिसरातील वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दहा दिवस चाललेल्या या शिबिरात प्रार्थना, हरिपाठ, भजन, कीर्तन, पखवाज वादन, गायन, व्याख्यान आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिराला विशेष सहकार्य म्हणून संजय जोशी, भास्कर पाटील, शेखर पाटील, संदेश पाटील, शशिकांत महाराज पाटील, महेंद्र महाराज जुईकर, नथुराम महाराज कुठे आदींसह सर्व बोपोली ग्रामस्थ परिसरातील भावीक मंडळी तसेच आचारी म्हणून मोफत सेवा दिली. चंद्रकांत जुईकर (तळाशेत), अनंत भालेकर (नवेनगर) यांनी विशेष सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

# बाजार गुणांचा भरला

'बाजार फुलांचा भरला, मज बहीण मिळेना' असे सुधीर फडके यांनी गायिलेले जुने गाणे आहे. नीट परिक्षा घोटाळ्याच्या चौकशीतून जे काही बाहेर येते आहे ते पाहून 'बाजार गुणांचा भरला'', असे म्हणण्याची पाळी आली आहे. या चौकशीत ज्या राज्यांची नावे आली आहेत त्यात राजस्थान व महाराष्ट्र ही दोन ठळक आहेत. आरंभी नाशिकच्या शुभम खैरनारला अटक करण्यात आली. हा बीएएमएसचा विद्यार्थी. स्वतःला डॉक्टर म्हणवून घेत होता. प्रश्नपत्रिका फोडून श्रीमंत बापांच्या मुलांना विकणे हा याचा उद्योग होता. याचे राजस्थान व दिल्लीतल्या क्लास माफियांशी संबंध होते. आणखीही काही प्राध्यापक व क्लासचालकांवर संशय निर्माण झाला आहे. पी.व्ही, कुलकर्णी आणि मनिषा मांढरे हे प्राध्यापक आणि लातूरचे शिवराज मोटेगावकर हे क्लासवाले यांना अटक करण्यात आली आहे. कुलकर्णी हे रसायनशास्त्राचे तर मांढरे या वनस्पतीशास्त्राच्या ज्येष्ठ प्राध्यापक. नीटची परिक्षा घेणाऱ्या मंडळावर म्हणजेच एनटीएवर तज्ज्ञ म्हणून त्यांची नेमणूक होती. आपापल्या विषयांच्या प्रश्नपत्रिका तयार करणे हे यांचे काम होते. यामुळे यांना नीटमध्ये काय येणार आहे हे आधीच कळत असे. त्याचा फायदा घेऊन हे दोघे विद्यार्थ्यांना आपल्या घरी बोलावत व संभाव्य प्रश्न सांगण्याच्या नावाखाली प्रश्नपत्रिका विकत असत. अर्थातच हेच प्रश्न अंतिमतः परिक्षेत येत व या क्लासला येणारे हमखास गुणवत्ता यादीत येऊन सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात जाण्याचा त्यांचा मार्ग मोकळा होत असे. सरकारी कॉलेजात प्रवेश मिळण्यासाठी ७२० पैकी ६५० गुण मिळणे आवश्यक असते. एकूण १८० प्रश्न असतात. प्रत्येक प्रश्नाच्या बरोबर उत्तराला ४ गुण असतात. चुकीच्या उत्तराचे उणे गुण वजा होतात. ते टाळणे आवश्यक असते. कुलकर्णी, मांढरे आणि मंडळी या विद्यार्थ्यांना अचूक प्रश्न व त्यांची उत्तरे (म्हणजे ए,बी,सी,डी यापैकीचे पर्याय) पुरवत असत. १८० पैकी आपापल्या विषयाचे मिळून किमान १५० प्रश्न हे दोघे देत. त्यामुळे किमान ६०० गुण तर तिथेच निश्चित होत असत. शिवाय उणे गुण मिळण्याची शक्यता संपे. विद्यार्थ्यांना फक्त हे प्रश्न व त्यांची उत्तरे यांची घोकंपट्टी करणे एवढेच करावे लागे.

## क्लास नावाचा धंदा

कुलकर्णी आणि मंडळींचे हे उद्योग यंदा योगायोगाने उघड झाले. ते बराच काळ चालू असण्याची शक्यता आहे. गेल्या काही वर्षांपासून लातूर, परभणी, नांदेड या शहरांमध्ये नीट व जेईई क्लासेसचे पेव फुटले आहे. पुणे, नागपूर, संभाजीनगर, नाशिक या ठिकाणी ते पूर्वीपासून होतेच. पूर्वी दहावी व बारावीतल्या लातूर पॅटर्नची चर्चा होती. त्यामुळे आरंभी अशीच काही शिकवण्याची विशेष पध्दत तेथील क्लासवाल्यांनी शोधली असावी किंवा ते मुलांवर अधिक मेहनत घेत असावेत असा लोकांचा समज होता. हे क्लासवाले अलिकडे टीव्ही वाहिन्यांवरून आक्रमकपणे जाहिरातीही करीत होते. वृत्तपत्रातही पानपानभर जाहिराती येत होत्या. या अतिरेकी जाहिरातबाजीमुळे संशय निर्माण झाला होताच. पण त्यावर आता शिक्कामोर्तब होत आहे. हे सर्वच क्लासवाले भ्रष्ट किंवा चोऱ्या करणारे आहेत असे कोणीही म्हणणार नाही. पण नीट किंवा जेईईमध्ये हमखास यशाची खात्री देण्याचे त्यांचे दावे आणि एकाएकी शेकडो विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीत येण्याइतके मिळणारे गुण हा प्रकार चक्रावून टाकणारा होता. पुण्यामुंबईच्या नामांकित क्लासेसमध्येही यशाचे प्रमाण इतके नव्हते व नसते. या पार्श्वभूमीवर मोटेगावकर नावाच्या क्लासवाल्यांना अटक झाल्याने सर्वच जण संशयाच्या भोवऱ्यात अडकणार आहेत. त्यांना आजवर मिळालेल्या यशाचा खुलासा करावा लागेल. चुकीच्या मार्गाने गेलेल्या विद्यार्थ्यांवर कायम टांगती तलवार राहणार आहे. कारण, ते या चौकशीच्या पट्ट्यात कधीही येऊ शकतात. नांदेडमध्ये एका विद्यार्थ्याच्या पालकांनी यंदा दहा लाख रुपयांना संभाव्य प्रश्नपत्रिका विकत घेतली असे निष्पन्न झाले आहे. असे आणखी किती पालक असतील हे शोधावे लागेल. यामुळे खरे गुणवान व त्यांचे प्रामाणिक पालक हेही संशयाच्या भोवऱ्यात येणार आहेत. एकेकाळी मराठवाड्यातूनच चाटे नावाच्या गृहस्थांनी अशीच जाहिरातबाजी करून यश मिळवले होते. शेकडो कोटींची उलाढाल, महाराष्ट्रभर क्लासेसचे जाळे, स्वतःची हॉस्टेल्स अशी समांतर शिक्षण व्यवस्थाच त्यांनी उभी करायचा प्रयत्न केला होता. त्यांच्यावर धाडी पडल्यानंतर त्यांचे साम्राज्य कोसळले. आता लातूर, नांदेड या भागातील क्लासवाल्यांचा धंदाही धोक्यात येणार आहे.

## संशय घ्यायला हवा

अर्थात, हे सर्व होण्याला आपली व्यवस्थाही तितकीच जबाबदार आहे. कुलकर्णी, मांढरे हे त्यांच्या विषयातले चांगले प्राध्यापक होते. मोटेगावकर हेही रसायनशास्त्राचे गुणवान प्राध्यापक होते. आरंभी ते विद्यार्थ्यांच्या शिकवण्या घेत सायकलवरून फिरत असत. मात्र नंतर त्यांनी हा शिक्षणाचा बाजार मांडला कारण, व्यवस्थेनेच असा बाजार उभा करायला प्रोत्साहन दिले. एकेकाळी बारावीच्या गुणांवर वैद्यकीय व अभियांत्रिकीचे प्रवेश होत असत. तसे प्रवेश होऊन आपल्याकडे उत्तम डॉक्टर व इंजिनिअर निर्माण झाले. पण एक देश एक धर्म एक भाषा याप्रमाणे नीट व जेईईच्या एकच परीक्षा भरवण्यास सुरुवात झाल्यापासून याला एका धंद्याचे स्वरुप आले. तीन तासांमध्ये १८० गुणांची उत्तरे देणे हा हुशारीचा व डॉक्टर होण्याचा एकमेव निकष ठरू लागला. त्यामुळेच मग त्यात खास भारतीय पध्दतीनुसार जुगाडाच्या युक्त्या शोधण्यात आल्या. पेपर फोडले व त्यातल्या प्रश्नांची उत्तरे पाठ केली की गुणवत्ता यादीत येण्याची हमी असे समीकरण तयार झाले. यातूनच मग क्लास नावाचे दलाल तयार झाले. राजस्थानमध्ये आधी कोटा शहराचा दबदबा होता. आता सिकर या शहराचे नाव वरचढ आहे. २०२४ मध्ये नीट परीक्षेत घोटाळा झाला होता तेव्हा याच सिकरचे नाव चर्चेत होते. तेव्हा ७२० पैकी ६५० गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जिथे जास्त आहे अशा देशभरातील ५० सेंटर्सपैकी ३७ एकट्या सिकर जिल्ह्यातील होती. नीट परीक्षा घेणाऱ्यांना २०२४ मध्येच याबाबत संशय घ्यायला हवा होता. पण तेव्हा काहीही कारवाई झाली नाही. हे सर्व झोल करणारे क्लासेसवाले एकदुसऱ्यांच्या संपर्कात असावेत असे मानायला जागा आहे. त्यातूनच त्यांनी बड्या शहरातील क्लासवाल्यांना टक्कर दिली. मात्र यात सर्व शिक्षण व्यवस्थेचे आणि मुख्यतः विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले. २०२४ मध्ये ७२० पैकी ७२० असे शंभर टक्के गुण मिळवणारे तब्बल ६७ विद्यार्थी असल्याचे उघड झाले होते. हेही इतिहासात कधी झाले नव्हते. तेव्हाच परीक्षा मंडळाने याची अधिक चौकशी करायला हवी होती. सिकर, लातूर, नांदेड इत्यादी एकाच भागात इतके अतिरेकी स्वरुपाचे यश मिळू लागते तेव्हा तात्काळ त्याबाबत संशय घेऊन खोलात जायला हवे हा यंदाच्या नीट प्रकरणाचा धडा आहे. तो शिकला नाही तर असे प्रकार पुन्हा पुन्हा घडत राहतील.

विचार

# स्थानिकांना नोकरी, कर्जबुडव्यांची मालमत्ता जप्ती

***अर्थनगरीमध्ये सरत्या आठवड्यात इंधन दरवाढीपलिकडेही काही लक्षवेधी बातम्या चर्चेत राहिल्या. पहिली बातमी म्हणजे जिल्हा बँकांमधील नोकरभरतीत यापुढील काळात स्थानिकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. दुसरी बातमी म्हणजे कर्ज न फेडल्यास यापुढे मालमत्ता जप्तीची कारवाई होऊ शकणार आहे. दरम्यान, अमेरिकेत हापूस आणि केशर आंबा काही मिनिटांमध्येच कसा संपतो याची रंजक माहिती समोर आली आहे.***




**महेश देशपांडे**

अर्थनगरीमध्ये सरत्या आठवड्यात इंधन दरवाढीपलिकडेही काही लक्षवेधी बातम्या चर्चेत राहिल्या. पहिली बातमी म्हणजे जिल्हा बँकांमधील नोकरभरतीत यापुढील काळात स्थानिकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. दुसरी बातमी म्हणजे कर्ज न फेडल्यास यापुढे मालमत्ता जप्तीची कारवाई होऊ शकणार आहे. दरम्यान, अमेरिकेत हापूस आणि केशर आंबा काही मिनिटांमध्येच कसा संपतो याची रंजक माहिती समोर आली आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील नोकर भरतीत भूमिपुत्रांसाठी आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्ह्यातील मूळ रहिवाशांसाठी ७० टक्के जागा राखीव ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सहकार विभागाकडून याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. बँकांचे कार्यक्षेत्र असलेल्या जिल्ह्यातील तरुणांना पदभरतीत प्राधान्य मिळणार आहे. केवळ ३० टक्के जागा जिल्ह्याबाहेरील उमेदवारांसाठी देता येणार आहेत. पदभरतीची जाहिरात काढलेल्या बँकांनाही आदेश लागू असणार आहे. राज्यातील ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आदेश लागू करण्यात आला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगारांना त्यांच्याच जिल्ह्यात नोकरीची संधी मिळणार आहे. राज्य सरकारने स्थानिक भूमि पूत्रांना रोजगार देण्यासाठी महत्वाचा निर्णय घेतला आहे.राज्यात सध्या ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका कार्यरत आहेत. त्या प्रामुख्याने शेतकरी आणि ग्रामीण विकास संस्थांशी जोडलेल्या आहेत. या जिल्हा सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र आणि सभासद त्या त्या विशिष्ट जिल्ह्यापुरतेच मर्यादित असतात. या बँकांना स्थानिक बोलीभाषा, भौगोलिक परिस्थिती आणि ग्रामीण भागातील प्रश्नांची जाण असलेले कर्मचारी मिळाल्यास या बँकांच्या ग्राहकांना आणि सभासदांना दर्जेदार सेवा देता येईल. या उद्देशाने सरकारने हा बदल केला आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकांची ओळख विकास संस्थांच्या मातृसंस्था अशी असते. गावातील विकास संस्थांचे अस्तित्व या बँकांवर अवलंबून असते. स्थानिक तरुणांची भरती झाल्याने बँकांचा कारभार अधिक लोकाभिमुख होईल आणि शेतकऱ्यांना कर्जपुरवठा तसेच इतर सुविधा मिळताना येणाऱ्या विविध अडचणी दूर होतील, असा विश्वास सहकार विभागाने व्यक्त केला आहे.

दरम्यान, रिझर्व्ह बँकेने नवीन मसुदा मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एखादी व्यक्ती कर्जाची परतफेड करण्यास अयशस्वी ठरल्यास बँक वसुलीसाठी त्यांची मालमत्ता जप्त करू शकते. या नवीन मसुदा नियमांनुसार, बँका आणि बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्या (एनबीएफसी) कर्जवसुली प्रक्रियेत केवळ एक अपवादात्मक उपाय म्हणून स्थावर मालमत्ता ताब्यात घेऊ शकतील. केंद्रीय बँकेने स्पष्ट केले आहे, की नियमित कर्ज देण्याच्या व्यवहारांच्या बदल्यात सामान्य परिस्थितीत नियामक संस्थांनी बिगरवित्तीय मालमत्ता ताब्यात घेणे अपेक्षित नाही. हा नियम बुडीत कर्जांशी (एनपीए) संबंधित मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचे नियम स्पष्ट करतो. रिझर्व्ह बँकेच्या मते जास्तीत जास्त वसुलीसाठी अशा मालमत्ता विहित वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने विकणे किंवा त्यांची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. आधीच एनपीए (बुडीत कर्ज) म्हणून घोषित केल्या गेलेल्या कर्जांनाच हा नियम लागू होतो.

बँकांनी प्रथम वसुलीच्या इतर सर्व पद्धती वापरून पाहिल्या पाहिजेत. त्यांना पैसे वसूल करण्यात अपयश आले तरच ही तरतूद लागू होईल. कर्जाच्या वसुलीच्या बदल्यात बँक किंवा वित्तीय संस्था कर्जदाराकडून निर्दिष्ट गैरवित्तीय मालमत्ता, म्हणजेच स्थावर मालमत्ता (जमीन, घर, इमारत इत्यादी) ताब्यात घेईल. यामध्ये गैर-बँकिंग मालमत्तांचा (एनबीए) समावेश आहे. मसुद्यानुसार, बँका अशी मालमत्ता जास्तीत जास्त सात वर्षांसाठीच ठेवू शकतात. त्यानंतर त्यांना ती विकावी लागते. तसेच, बँका ही मालमत्ता पुन्हा त्याच कर्जदाराला किंवा त्याच्याशी संबंधित लोकांना विकू शकत नाहीत. यामुळे फसवणूक रोखण्यास मदत होईल. आता बँकांना त्यांच्या ताळेबंदात अशा मालमत्तांची संपूर्ण माहिती द्यावी लागणार आहे. यामुळे गुंतवणूकदार आणि इतरांना बँकेची स्थिती अधिक चांगल्या प्रकारे समजण्यास मदत होईल. रिझर्व्ह बँकेने २६ मे पर्यंत या नियमांवर सामान्य जनता आणि भागधारकांकडून सूचना मागवल्या आहेत. यानंतर अंतिम नियम निश्चित केले जातील.

आता एक लक्षवेधी बातमी. भारतीय आंब्यांची लोकप्रियता इतकी वाढली आहे, की अमेरिकेतील अनेक दुकानांमध्ये आंबे विक्रीसाठी येताच काही मिनिटांमध्ये संपून जात आहेत. भारतीय चवीचा आणि सुगंधाचा हा गोड ठेवा आता जागतिक बाजारपेठेतही आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत आहे. अमेरिकेतील एका स्टोअरमधील अनुभव सांगताना एकाने नमूद केले, की सायंकाळी ४:५६ वाजता आंब्यांचा स्टॉक दुकानात आला आणि अवघ्या वीस मिनिटांमध्ये, म्हणजे ५:१६ वाजेपर्यंत तो पूर्णपणे संपला. ही पोस्ट मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाली. न्यूयॉर्कमध्ये राहणाऱ्या एका भारतीय महिलेने इंस्टाग्रामवर शेअर केलेल्या व्हिडीओमधून हा अनुभव अधोरेखित केला. तिने सांगितले की, न्यूयॉर्क शहरात तिने तीन आंबे पाच डॉलर्सना विकत घेतले आणि आंबे खाताना भारतातील भावंडांसोबतचे उन्हाळ्याचे दिवस आठवत असल्याची भावनिक प्रतिक्रिया व्यक्त केली. यातून आंबा हे केवळ फळ नसून भारतीयांच्या भावविश्वाशी जोडलेली सांस्कृतिक आठवण असल्याचे स्पष्ट होते. अमेरिकन बाजारपेठेत विशेषतः हापूस आणि केशर आंब्यांच्या जातींची मोठी मागणी दिसून येते. महाराष्ट्रातील कोकण पट्ट्यात पिकणारा हापूस आंबा अप्रतिम गोडवा, वैशिष्ट्यपूर्ण सुगंध आणि मऊ गरासाठी जगभर प्रसिद्ध आहे, तर गुजरातमधील केशर आंबा रसाळपणा आणि गडद केशरी रंगासाठी ओळखला जातो. अमेरिकेत राहणारे भारतीय नागरिक या आंब्यांसाठी दुकानांबाहेर रांगा लावत आहेत. अनेकांनी हंगाम सुरू होण्यापूर्वीच या आंब्यांची आगाऊ नोंदणी केली.

याच सुमारास आलेली आणखी एक दखलपात्र बातमी म्हणजे इराणला शस्त्रे आणि लष्करी साहित्य पुरवणाऱ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांविरोधात अमेरिकेने मोठी कारवाई करत दहा कंपन्या आणि व्यक्तींवर निर्बंध जाहीर केले आहेत. या कारवाईमध्ये चीन, हाँगकाँग, दुबई, बेलारूस आणि इराणमधील काही कंपन्यांचा समावेश आहे. अमेरिकेच्या ट्रेझरी विभागाने या कंपन्यांवर इराणच्या संरक्षण क्षेत्राला मदत केल्याचा आरोप केला आहे. अमेरिकेच्या म्हणण्यानुसार या कंपन्यांनी इराणच्या लष्कराला शस्त्रे, उपकरणे आणि कच्चा माल उपलब्ध करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. विशेषतः इराणच्या 'शाहिद ड्रोन कार्यक्रमा'साठी लागणाऱ्या साहित्याच्या खरेदीत त्यांनी मदत केल्याचा आरोप आहे. 'शाहिद ड्रोन' इराणच्या संरक्षण धोरणातील महत्त्वाचे साधन मानले जाते आणि पश्चिम आशियातील संघर्षांमध्ये त्यांचा वापर झाल्याचे अनेकदा समोर आले आहे. अमेरिकेच्या ट्रेझरी विभागाने स्पष्ट केले, की, इराणच्या लष्करी-औद्योगिक जाळ्यावर आणखी आर्थिक दबाव आणण्यासाठी भविष्यातही कठोर पावले उचलली जातील. इराणला आपली उत्पादनक्षमता वाढवण्यापासून रोखणे आणि आपल्या सीमेबाहेरील प्रभाव विस्तारण्यास अडथळा निर्माण करणे हा या कारवाईमागील प्रमुख उद्देश असल्याचे अमेरिकेने म्हटले आहे. याशिवाय, इराणच्या कथित अवैध व्यापाराला मदत करणाऱ्या परदेशी कंपन्या आणि वित्तीय संस्थांनाही भविष्यात आणखी निर्बंधांना सामोरे जावे लागू शकते, असा इशाराही देण्यात आला आहे.

अमेरिकेचे ट्रेझरी सचिव स्कॉट बेसेंट यांनी सांगितले, अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली अमेरिका इराणच्या लष्कराला मदत करणाऱ्या विदेशी कंपन्यांवर लक्ष केंद्रित करत राहील. अमेरिकन सैन्याविरोधात वापरली जाणारी शस्त्रे आणि तंत्रज्ञानाचा पुरवठा थांबवणे हे प्रमुख ध्येय असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे ही कारवाई ट्रम्प यांच्या प्रस्तावित चीन दौऱ्याच्या काही दिवस आधी करण्यात आली आहे. या दौऱ्यात ट्रम्प आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात महत्त्वपूर्ण चर्चा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे चीनशी संबंधित कंपन्यांवर कारवाई करण्यामागे केवळ सुरक्षाविषयकच नव्हे, तर व्यापक भू-राजकीय संदेशही दडलेला असल्याचे मानले जात आहे. अमेरिकेने उचललेले हे पाऊल केवळ आर्थिक निर्बंधांचे नसून जागतिक सामरिक संघर्षाच्या व्यापक समीकरणांचा भाग मानले जात आहे. इराणच्या वाढत्या लष्करी प्रभावाला मर्यादा घालण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आणि त्यातून निर्माण होणारे आंतरराष्ट्रीय राजकीय परिणाम याकडे आता जगाचे लक्ष लागले आहे.

चर्चा आजची

# तरुणांच्या स्वप्नांना संधींचं बळ!

**राकेश लोहार**

रायगड आज एका मोठ्या परिवर्तनाच्या उंबरठ्यावर उभा आहे. एकेकाळी केवळ निसर्गसौंदर्य, शेती, मासेमारी आणि पारंपरिक व्यवसायांसाठी ओळखला जाणारा हा जिल्हा आता औद्योगिक, शैक्षणिक आणि सेवा क्षेत्रातील नव्या संधींचे केंद्र बनत आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, वाढणारे पर्यटन, औद्योगिक प्रकल्प, सेवा क्षेत्राचा विस्तार आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे रायगडच्या भविष्याला नवे आयाम मिळत आहेत.

आजही ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या शोधात भटकताना दिसतात. हातात पदवी असते; पण कौशल्यांचा अभाव, इंग्रजी संभाषणाची भीती, योग्य मार्गदर्शनाचा अभाव आणि आर्थिक अडचणी यामुळे अनेक स्वप्ने अपूर्ण राहतात. मोठ्या शहरांमध्ये जाऊन प्रशिक्षण घेणे प्रत्येकाला शक्य नसते. अनेक पालक आपल्या मुलांनी मोठे व्हावे, चांगल्या क्षेत्रात काम करावे, असे स्वप्न पाहतात; पण परिस्थिती आडवी येते. अशा परिस्थितीत अलिबागमध्ये सुरू झालेले अत्याधुनिक स्किल ट्रेनिंग सेंटर हे रायगडच्या युवकांसाठी आशेचा किरण ठरत आहे. पीएनपी एज्युकेशन सोसायटी आणि आयईएसपी यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू झालेला हा उपक्रम केवळ एक संस्था नाही, तर ग्रामीण युवकांना जागतिक स्पर्धेसाठी तयार करणारे व्यासपीठ आहे.

या केंद्रामध्ये एव्हिएशन, एअरपोर्ट ऑपरेशन, एअर होस्टेस, केबिन क्रू, हॉस्पिटेलिटी, हेल्थकेअर, ग्राहक सेवा, कॉर्पोरेट ट्रेनिंग, व्यक्तिमत्त्व विकास, ग्रूमिंग, कम्युनिकेशन स्किल्स यांसारख्या आधुनिक अभ्यासक्रमांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, प्रशिक्षणासोबत रोजगार सहाय्य आणि उद्योगांशी थेट संपर्क यावरही भर देण्यात आला आहे. त्यामुळे शिक्षणानंतर नोकरी मिळवण्यासाठी युवकांना वेगळी धडपड करावी लागणार नाही.

आजच्या काळात रोजगाराचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. केवळ पारंपरिक पदव्या पुरेशा राहिलेल्या नाहीत. उद्योगविश्वाला तांत्रिकदृष्ट्या सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि व्यावसायिक दृष्टिकोन असलेले युवक हवे आहेत. रायगडच्या ग्रामीण भागातील मुलांमध्ये ती क्षमता आहे; गरज आहे ती योग्य संधी आणि प्रशिक्षणाची. हेच ओळखून हा उपक्रम उभारण्यात आला आहे. या संपूर्ण विचारामागे पाटील कुटुंबाची अनेक दशकांची सामाजिक बांधिलकी आणि दूरदृष्टी आहे. रायगडमधील युवक, शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य कुटुंबांच्या प्रगतीसाठी या घराण्याने सातत्याने काम केले आहे. स्वर्गीय नारायण नागू पाटील यांनी शेतकरी चळवळीच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभी केली. त्यांनी केवळ आंदोलन केले नाही, तर कष्टकरी माणसांच्या आयुष्याला आधार देण्याचे काम केले. त्यानंतर स्वर्गीय दत्ता पाटील आणि स्वर्गीय प्रभाकर पाटील यांनी शिक्षण, सहकार आणि सामाजिक क्षेत्रात मोठे कार्य उभे केले. कोएसो, पीएनपीसारख्या संस्था उभारून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्या काळात शिक्षण ही ग्रामीण भागासाठी दुर्मिळ संधी होती; पण या संस्थांमुळे हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची नवी दिशा मिळाली. जयंत पाटील यांनी सहकार आणि बँकिंग क्षेत्रातून युवकांसाठी रोजगारनिर्मितीची मोठी दालने उभी केली. बँकिंग, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी अनेकांना संधी उपलब्ध करून दिली. आजही रायगडमधील अनेक कुटुंबांच्या आर्थिक उभारणीत या संस्थांचा मोठा वाटा आहे.

त्याच परंपरेत आज नृपाल पाटील, चित्रलेखा पाटील यांनी शिक्षण, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रात आधुनिक विचारांची जोड देत अनेक उपक्रम सुरू केले आहेत. पीएनपी समूहाच्या माध्यमातून हजारो स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. अनेक तरुणांना स्वतःच्या जिल्ह्यातच करिअर घडवण्याची संधी मिळाली आहे. स्थानिकांना रोजगार देण्याला प्राधान्य देत त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. विशेष म्हणजे, आधुनिक युगात रायगडचा युवक मागे राहू नये, गावातील मुलांनीही मोठ्या क्षेत्रात झेप घ्यावी, त्यांना मुंबई-पुण्याच्या दारात नोकरीसाठी भटकावे लागू नये, यासाठी पाटील कुटुंबाने नेहमीच मदतीचा हात दिला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार यांची सांगड घालून सक्षम करण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न या कुटुंबाकडून होत आला आहे.

यामध्ये चित्रलेखा पाटील यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आणि प्रेरणादायी आहे. स्थानिक युवक बेरोजगार राहू नयेत, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळावी, मुलींनाही एव्हिएशन, हॉस्पिटेलिटी आणि कॉर्पोरेट क्षेत्रात मोठ्या संधी मिळाव्यात, यासाठी त्या सातत्याने पुढाकार घेत आहेत. युवकांना थेट रोजगाराशी जोडण्यासाठी स्वतंत्र रोजगार फोरम उभारणे, कंपन्यांशी संपर्क साधणे, प्रशिक्षण आणि नोकरी यामधील दुवा निर्माण करणे यामध्ये त्यांची मोठी भूमिका आहे. आज या उपक्रमामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये आनंद, समाधान आणि आत्मविश्वासाचे वातावरण आहे. ''आता आमच्या मुलांना चांगल्या शिक्षणासाठी आणि आधुनिक प्रशिक्षणासाठी मुंबई किंवा पुण्यात धाव घ्यावी लागणार नाही,'' असे अनेक पालक अभिमानाने सांगत आहेत. ग्रामीण भागातील पालकांसाठी ही केवळ संस्था नाही, तर त्यांच्या मुलांच्या भविष्याची नवी आशा आहे.

आज रायगडमधील हजारो युवक विविध कंपन्या, सेवा क्षेत्र, उद्योग आणि संस्थांमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत. या मागे शिक्षण आणि रोजगाराला दिलेले प्राधान्य, सामाजिक विचार आणि युवकांप्रती असलेली बांधिलकी आहे. ही केवळ संस्था उभारण्याची प्रक्रिया नाही; तर एका संपूर्ण पिढीला सक्षम करण्याचा ध्यास आहे. रायगडचा युवक आता केवळ नोकरी शोधणारा राहणार नाही; तो स्पर्धात्मक जगात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारा ठरणार आहे. गावातील तरुणांनीही विमानतळ, कॉर्पोरेट क्षेत्र, हॉस्पिटेलिटी, हेल्थकेअर आणि जागतिक उद्योगविश्वात झेप घ्यावी, यासाठी सुरू झालेला हा उपक्रम भविष्यात रायगडच्या सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. खऱ्या अर्थाने, ही केवळ प्रशिक्षण केंद्राची सुरुवात नाहीतर रायगडच्या युवकांच्या नव्या आत्मविश्वासाची, नव्या स्वप्नांची, नव्या संधींची सुरुवात आहे.

लोकसंसद

## माउंट एव्हरेस्ट तब्बल ३२ व्यांदा सर केले, नवा विश्व विक्रम!

७३ वर्षांपूर्वी जगातील अत्यंत खडतर असलेल्या माउंट एव्हरेस्ट शिखरावर न्यूझीलंडचे गिर्यारोहक एडमंड हिलरी आणि त्यांचे शेर्पा मार्गदर्शक तेनसिंग नोर्गे यांनी २९ मे १९५३ रोजी सर्वप्रथम ऐतिहासिक पाऊल ठेवल्यानंतर आजच्या घडीला दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर जगभरातील ७५६० गिर्यारोहकांनी हे सर्वोच्च शिखर पादाक्रांत केले. खरे तर ८८४९ मीटर (२९ हजार ३२ फूट) उंचीचे जगातील सर्वोच्च एव्हरेस्ट शिखर चढून जाणे हे जगातल्या अनेक गिर्यारोहकांचे स्वप्न असते. जगभरातून हजारो गिर्यारोहक या स्वप्नपूर्तीसाठी एव्हरेस्टवर चढाईसाठी येतात. पण त्यातील काही जणच तेथे पोहोचतात. कारण आजतागायत ३४० गिर्यारोहकांना या स्वप्नपूर्तीपायी मरणाला सामोरे जावे लागले आहे. मात्र जगातील सर्वात उंच असणारे माऊंट एव्हरेस्ट हे शिखर एका नेपाळी शेर्पाने एक-दोन वेळा नव्हे तर चक्क ३२ वेळा सर करून नव्या विश्व विक्रमाला गवसणी घातली आहे. 'एव्हरेस्ट मॅन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या ५६ वर्षीय गिर्यारोहकाचे नाव 'कामी शेर्पा रिता' असे आहे. याच मोहिमेदरम्यान दिग्गज गिर्यारोहक आणि 'पर्वत राणी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ५२ वर्षीय महिला ल्हाक्पा शेर्पा यांनीही ११ व्यांदा एव्हरेस्ट शिखर सर करून जगातील सर्वोच्च शिखराची सर्वाधिक वेळा यशस्वी चढाई करणारी महिला म्हणून गिर्यारोहणाच्या इतिहासात आपले नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले. कामी रिता शेर्पा (३२ वेळा) आणि ल्हाक्पा शेर्पा (११ वेळा) यांचे विक्रमी वेळा माऊंट एव्हरेस्ट शिखर सर केल्याबद्दल जगभरातून कौतुक होत आहे.

**– प्रदीप अनुसया मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# प्रसिद्ध नाटककार विजय तेंडुलकर

विजय तेंडुलकर यांचा जन्म ६ जानेवारी १९२८ रोजी मुंबईत गिरगाव येथे झाला. घरातील साहित्यिक वातावरणाने तरुण विजयला लेखनास प्रवृत्त केले. वयाच्या ६ व्या वर्षी त्यांनी पहिली कथा लिहिली. पाश्चिमात्य नाटकं पाहून ते मोठे झाले आणि स्वत: नाटकं लिहिण्याची प्रेरणा मिळाली. ११ व्या वर्षी त्यांनी त्यांच्या पहिल्या नाटकाचे लेखन, दिग्दर्शन आणि अभिनय केला. १४ व्या वर्षी त्यांनी शिक्षण सोडून १९४२ च्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. तेंडुलकरांनी वृत्तपत्रांसाठी लेखनाने करिअरची सुरुवात केली. ङ्गगृहस्थफ हे तेंडुलकरांचे पहिले नाटक. सुरुवातीच्या नाटकांपासूनच माणसाच्या जीवनाचा, विकारांचा वेध घेण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. शांतता! कोर्ट चालू आहे यासारख्या नाटकातून बंडखोर वाटणाऱ्या विषयांनाही त्यांनी हात घातला. 'सखाराम बाईंडर'मध्ये हाताळलेला स्फोटक विषय आणि 'घाशीराम कोतवाल'मध्ये हाताळलेला पारंपरिक तंत्राला धक्का देणारा नाट्यबंध त्यांच्या प्रयोगशील जाणिवांचा अविभाज्य भाग होता. कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणाऱ्या जनस्थान पुरस्काराचे तेंडुलकर पहिले मानकरी होते. कलावंत, नाटककार यांची प्रतिभा, त्यांचे दूरदृष्टीचे प्रातिभ आकलन हे जसे कालसंवादी असते तसेच कधी -कधी काळाच्या पुढचेही! म्हणूनच तेंडुलकरांच्या नाटकातील ही भविष्यगामी दूरदृष्टी तथाकथित संस्कृतीरक्षकांना सहन झाली नाही. म्हणूनच त्यांच्या नाटकावर खटले दाखल झाले, परंतु तेंडुलकर हे सुसंस्कृत समाजातील सुंदर जीवनदर्शनाबरोबरच जीवनातील असत्याचे, अमंगलाचे, कुरूपतेचे, बीभत्सतेचेही उघडे-नागडे दर्शन आपल्या नाट्यकृतीतून घडवत होते. एकाच नाटकातील परस्परविरोधी चित्रणातून त्यांनी असे दर्शन घडवले. माणसाच्या अस्तित्वाला प्रभावित करणारी कामप्रेरणा असो की, मनातील प्रेमभावना या दोन्ही बाजूंचे दर्शन त्यांनी आपल्या नाटकातून घडवले आहे. अशी पाखरे येती अशा सुंदर शीर्षकाचे हळवे, भावविभोर नाटक लिहिणारे तेंडुलकर तितक्याच सशक्तपणे, सामर्थ्याने गिधाडे, बेबी, सखाराम बाईंडरसारखी नाटके लिहितात. त्यांच्या या नाटकाचे आकलन, अन्वयार्थ, समीक्षा केवळ सामाजिक विश्लेषणातून करता येत नाही, तर विसाव्या शतकातील मानसशास्त्रीय तथ्यांच्या उजेडात, सिग्मंड फ्रॉइडच्या मनोविश्लेषण सिद्धांताच्या आधारे ते करावे लागते. समाजातील दांभिक, बेगडी, संस्कृतीचे संकेत पाळणाऱ्या समाजाकडून स्त्रीचे कसे शोषण होते? स्त्रीकडे कसे भोगवादी, वस्तू म्हणून बघितले जाते?, तसेच कौमार्य, योनिशुचिता, विवाहपूर्व सबंध, स्त्रीचे पावित्र्य इत्यादी अनेक विषय या नाटकातून समोर आले. स्त्रीच्या खासगी आयुष्याबद्दल गॉसिप करण्यात, चर्चा रंगवण्यात असे विषय चघळत बसण्यात काही लोकांना मजा वाटते. १९७० मध्ये संगीत नाटक अकादमी पुरस्कार, कमलादेवी चट्टोपाध्याय पुरस्कार, १९७७ मध्ये मंथनसाठी सर्वोत्कृष्ट पटकथेचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, १९८१ मध्ये 'आक्रोश' चित्रपटासाठी फिल्म फेअरचा सर्वोत्कृष्ट कथा व पटकथा पुरस्कार, १९८३ मध्ये 'अर्धसत्य'साठी सर्वोत्कृष्ट पटकथेसाठी फिल्म फेअर पुरस्कार त्यांना मिळाला. पद्मभूषण, महाराष्ट्र गौरव, सरस्वती सन्मान, मध्य प्रदेश सरकारचा कालिदास सन्मान, विष्णुदास भावे गौरव पदक आदी पुरस्कारही त्यांना मिळाले. मायस्थेनिया ग्रॅव्हिस या दुर्मीळ रोगाशी लढताना १९ मे २००८ रोजी विजय तेंडुलकर यांचे पुण्यात निधन झाले.

## जाहिर नोटिस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मोजे जिर्णे, ता. पेण जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री. एकनाथ चांगो देशेकर यांनी त्याचे नमुद विद्यमान अस्मिता जगदीश पाटील यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| जिर्णे | १७६ | ०.५१.४०<br>पो.ख.०.१०.७०<br>एकुण क्षेत्र ०.६२.१० | ५.३५ |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.
टिप:- सदर नोटीस खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण:- पेण
दि :- १८/०५/२०२६

सही/-
**ॲड. हेमा.ज.पाटील (घोडिंदे)**
पेण पोलिस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोट आळी पेण मो.नं.९८२२०३०३८९

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे साळोख तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) मनोहर मधुकर पवार २) शंकर नारायण देवघरे ३) सुनिल मधुकर शिर्के यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे साळोख तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २९ | १/ब | ०-२०-०० | २-६१ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १९/०५/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशील यांनी खालील लिहून देणार मिळकतीचे मालक मालक मे. एस बी पी रियालिटी प्रायव्हेट लिमिटेड तर्फे जुबेर डी.जागीरदार यांनी खालील वर्णन केलेली मिळकत कायम खरेदीखताने आमचे अशील मुजाहिद अब्दुल रौफ खोत व अन्वर इस्माईल मोजावाला विकत देण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे

**मौजे दामत, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| ६३ | ०.२९.९०<br>पो.ख ०.०६.३०<br>एकूण ०.३६.२० गुंठे | ५.३१ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, विकसनकरार, ताबा, कब्जा, वहिवाट, गहाण, दान, लिज, वैगरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत खालील सही करणार वकील यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत हि निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशील व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दिनांक १८/५/२०२६

सही/-
**वकील किशोर अनंता दिघे**
पत्ता - मुखाड्याचापाडा, पो. पाषाणे
ता. कर्जत, जि. रायगड
मो नं ८००७९७०१५१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या शेती मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अर्जित चटर्जी, रा. मुंबई यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - शिलीम ता. माणगाव, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| २८/१/अ | १-६२-०० | ०-३० |

पैकी मिळकत मालकाचे क्षेत्र १-०२-०० हे. आर यांपैकी ०-४०-० हे. आर

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : १५/०५/२०२६

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली,
ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, खालील नमूद केलेली जमिन मिळकती श्री.सुरेश हरिश्चंद्र घरत यांच्या मालकीची असून सदर जमिन मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कोळगांव, ता.अलिबाग, जि.रायगड | १६४ | जिरायत ०-१०-३०<br>पो.ख. ०-०२-८०<br>एकूण ०-१३-१० | .६० |

सदर जमिन मिळकत ही या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत असून ती विकणेचा त्यास हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या निरंतरचा हक्क, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज, वारसाहक्क, दान, लिएन, चार्ज, पोटगी अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन सात दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत तक्रारी अथवा हरकती न आल्यास वरील मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व त्यांच्यावर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असून ही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिलेला आहे, असे गृहित धरुन माझे अशिल व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
नोटीस प्रसिद्ध करण्यास माझी हरकत नाही.

ॲड. गीता सं. पवार

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे राजेवाडी, ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. शशिकांत बाळु पालकर वैगरे ८ सर्व रा. मु. नवघर, पो. रामराज ता. अलिबाग यांच्या नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बयाणा पावती विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| राजेवाडी ता.अलिबाग जि. रायगड | १६/४ | १-०१-२०<br>**पो.ख. ०-०७-६०**<br>एकूण क्षेत्र १-०८-८० | २५.३१ |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :-१९/०५/२०२६

सही/
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालया समोर गाळा क्र.३, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकां बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-**
**परिशिष्ट -**
**मौजे तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) अभिषेक रमेश देवकर | १२ | ३ | ०-४७-५० | ७ | ८० |
| २) जयश्री रमेश देवकर | १४ | १ | ०-४५-५० पैकी ०-२०-०० | ३ | २७ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- १९/०५/२०२६
मो. नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे साळोख तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे विद्यमान मालक १) मनोहर मधुकर पवार २) शंकर नारायण देवघरे यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे साळोख तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २९ | २ | ०-०३-०० | ०-०६ |
| २९ | ६ | ०-१९-०० | ०-३६ |

तरी वरील मिळकतींच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १९/०५/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर, मुद्रे खुर्द,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदी खताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - कळंब, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| आनंद श्रीपाद परांजपे | १७६ | २ | ०-९६-० | १ | ३१ |
| | यापैकी विक्री केलेले क्षेत्र ०-६६-० मात्र | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-१९/०५/२०२६

## जाहीर नोटीस

दि. १६/०५/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक किरण दत्तात्रेय मोडखरकर यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन कमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार |
|---|---|---|---|
| तळाशेत ता.अलिबाग | १५ | ०-६५-००<br>पो.ख ०-०५-००<br>एकुण क्षेत्र ००-७०-०० | १.४१ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी ०-४३-७१ हे.आर. ही मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ (सात) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी (पळी आंबेघर),
पो. पोयनाड ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

महाराष्ट्र शासन
सहकार विभाग
सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय
काँग्रेस भुवन ट्रस्ट इमारत, पहिला मजला, महर्षी कर्वे रोड, मु.पो.अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड पिन कोड ४०२२०१
Email ID : arcsalibag@gmail.com ४०३

जा.क्र. सनिअ/वि.१/का.क.१०१/सिद्धेश्वर पत/सुनावनी नोटीस/२०२६
दि. १८/०५/२०२६

## जाहीर नोटीस

**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अलिबाग जि. रायगड यांचे समोर**
**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये जाहीर नोटीस**

ज्या अर्थी सिद्धेश्वर ग्रामीण पतसंस्था मर्या. बामणगांव यांनी दिनांक ०९/०३/२०२६ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली दाखला मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे. आणि ज्याअर्थी नियमाचे नियम ८६ ब नूसार सर्व प्रतिवादिस नोटीस दिनांक ०९/०३/२०२६ व दिनांक ३०/०३/२०२६ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. परंतु प्रतिवादी अनु.क्र. १ यातील कर्जदार व जामिनदार यांना दि.०९/०३/२०२६ रोजी हाती नोटीस बजावुन सुद्धा सुनावणीस गैरहजर राहिले. अनु.क्र. २ यातील कर्जदार व जामिनदार क्र. १ यांना दि. ०९/०३/२०२६ व दि. ३०/०३/२०२६ रोजी नोटीस बजावुन सुद्धा सुनावणीस गैरहजर राहिले. नोटीसा मिळालेल्या नाहीत असा कर्जदार व जामिनदार यांना सदर कलम अन्वये व नियमाखाली जाहीर नोटीशीद्वारे आपले म्हणणे दाखल करण्यासाठी संधी देण्यात येत आहे. अनु क्र. १ व २ मधील विनंती केली आहे. कर्जदार व जामिनदार दि. १८/०५/२०२६ रोजीच्या सुनावनीस गैरहजर होते. तसेच अजर्दाराने जाहीर नोटीस देणेची विनंती केली आहे.

